रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक ४३
www.ramprahar.com
शनिवार, ३० ऑगस्ट २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

दोन एसटी बसची समोरासमोर धडक; आठ प्रवासी जखमी/२
रेल्वे पोलीस करणार बेवारस मोबाईल्सचा लिलाव/६
माथेरानमध्ये हिंदू-मुस्लिम एकोप्याचे दर्शन/७

## राज्यात दमदार पाऊस; मराठवाड्यात अतिवृष्टी




**मुंबई** : राज्याच्या विविध भागात जोरदार पाऊस कोसळत आहे. त्यामुळे अनेक ठिकाणी जनजीवन विस्कळीत झाल्याचे दिसून आले. विशेषत: मराठवाड्यात पावसाने धुमाकूळ घातला असून नांदेड, परभणी जिल्ह्यात मोठे नुकसान झाले आहे. नांदेडमध्ये गुरुवारी संध्याकाळपासून मोठ्या प्रमाणात पावसाने हजेरी लावली. ढगफुटीसदृश्य पावसामुळे रस्ते जलमय झाले आणि त्यांना नदीचे स्वरूप आले. परभणीमधील पालम तालुक्यात शेकडो हेक्टर शेतजमीन पाण्याखाली गेली आहे. हिंगोलीच्या कळमनुरी तालुक्यातील ग्रामीण भागात मुसळधार पाऊस पडला. यवतमाळच्या उमरखेड आणि महागाव तालुक्यात विजेच्या कडकडाटासह धुवाधार पावसाने हजेरी लावली. बीड जिल्ह्यातही जोरदार पाऊस पडला. इकडे मुंबई, नवी मुंबईतही सकाळपासून जोरदार पाऊस पडल्याने जनजीवनावर परिणाम झाल्याचे दिसून आले.

### जरांगेंच्या आंदोलनाला एक दिवस मुदतवाढ

# सरकार सकारात्मक

## मराठा समाजाबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांची भूमिका



**मुंबई : प्रतिनिधी**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी समाजाचे नेते मनोज जरांगे-पाटील यांनी मुंबईतील आझाद मैदानावर सुरू केलेल्या आंदोलनाला आणखी एक दिवसाची मुदतवाढ मिळाली आहे. या आंदोलनाची मुदत शुक्रवारी (दि.२९) संध्याकाळी ६ वाजता संपणार होती, पण आता हे उपोषण शनिवारपर्यंत सुरू राहील. दरम्यान, यावर प्रतिक्रिया देताना सरकारची भूमिका पहिल्यापासूनच सकारात्मक आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले.

प्रसारमाध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, लोकशाही मार्गाने आंदोलन करणाऱ्यांना आम्ही नेहमीच सहकार्य करत आहोत. मुंबई पोलिसांच्या मदतीने सर्व आंदोलकांना मदत केली जात आहे. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे सर्व गोष्टी नियमानुसार होत आहेत.

कुठल्याही परिस्थितीत दोन समाज एकमेकांसमोर उभे राहू नयेत, असा सरकारचा प्रयत्न आहे. गेल्या १० वर्षांत आमच्या सरकारनेच मराठा समाजाला न्याय देण्याचे काम केले आहे. इतर कोणत्याही सरकारमध्ये ते झालेले नाही. शिक्षण आणि रोजगाराच्या योजनाही आमच्या काळात आल्यात. मराठा आरक्षणासाठी आम्ही सकारात्मकच आहोत. आम्हाला ओबीसी समाजालाही सांभाळावे लागेल आणि मराठा समाजालाही न्याय द्यावा लागेल, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी नमूद केले.

या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी सरकारने मंत्रिमंडळाची उपसमिती तयार केली आहे. केवळ आश्वासने देऊन चालणार नाही, आम्हाला कायदेशीर मार्ग काढावे लागतील. या प्रश्नावर आम्ही प्रयत्नपूर्वक तोडगा काढू. प्यादे लढवणे किंवा लोकांना एकमेकांसमोर झुंजवणे हे आमच्या सरकारचे धोरण नाही, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

मुख्यमंत्र्यांनी या वेळी आंदोलकांना शांततेचे आवाहन केले. काही तुरळक घटनांमध्ये आंदोलकांनी रास्ता रोको केला, पण पोलिसांनी चर्चा केल्यानंतर त्यांनी तो लगेच मोकळा केला. काही अतिउत्साही लोक मात्र जाणीवपूर्वक आंदोलनाला गालबोट लावण्याचा प्रयत्न करत आहेत. मी सर्व आंदोलकांना आवाहन करतो की, कुणीही गैरलोकशाही पद्धतीने वागू नये, असे मुख्यमंत्री म्हणाले.

### '...तर विरोधकांचे तोंड भाजेल'



काही लोक जाणीवपूर्वक आंदोलन भडकविण्याचा प्रयत्न करत आहेत. ओबीसी आणि मराठा यांच्यात भांडण कसे लागेल? असा प्रयत्न केला जात आहे. सकाळपासून काही लोकांची विधाने मी ऐकली. त्यांचे प्रयत्न आमच्या लक्षात येत आहेत. आंदोलनावर पोळी भाजण्याचा प्रयत्न करू नका, तुमचे तोंड भाजेल हे मला सांगायचे आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस या वेळी विरोधकांना उद्देशून म्हणाले. सोयीची भूमिका घेऊ नका, ठाम भूमिका घ्या. जे कायदेशीर आहे ते होईलच, पण विरोधक ठाम भूमिका घेत नाहीत, कारण त्यांना समाजा समाजात भांडणे लावून राजकीय लाभ घ्यायचा आहे. आम्हाला मात्र कोणत्याही समाजाला नाराज करायचे नाही. आम्ही सर्व समाजाच्या इच्छा समजून घेत आहोत आणि त्या पूर्ण करण्याचा प्रयत्न करत आहोत, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त

# नागरिकांना गणपतीचा मोफत शिधा वितरित

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दानशूर व्यक्तिमत्व, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त गव्हाण जिल्हा परिषद विभाग आणि उलवे नोड भारतीय जनता पक्षाच्या वतीने गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर परिसरातील गोरगरीब रहिवाशांना मोफत गणपतीचा शिधा वितरित करण्याचा कार्यक्रम गुरुवारी मोठ्या उत्साहात झाला. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा तिथीनुसार अमृत महोत्सवी वाढदिवस असल्याने मान्यवरांच्या हस्ते पुष्पगुच्छ, शाल आणि गुलाबाचा महापुष्पहार घालून त्यांचे अभीष्टचिंतन करण्यात आले.





रयत शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ मॅनेजिंग कौन्सिल सदस्य आणि जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे चेअरमन असलेले लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त पनवेल-उरण परिसरात वर्षभर विविध उपक्रम आयोजित केले जात आहेत. गुरुवारी त्यांचा तिथीनुसार अमृत महोत्सवी वाढदिवस असल्यामुळे त्यांच्या संकल्पनेतून गव्हाण व उलवे नोडमधील रहिवाशांना आणि गोरगरिबांना मोफत गणपतीचा शिधा वाटप करण्यात आला.

या कार्यक्रमाला आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य डॉ. सदाशिवराव कदम, जे.के. जाधव, भाजपचे ज्येष्ठ नेते जे.एम. म्हात्रे, वाय.टी. देशमुख, राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, दिवंगत दि.बा.पाटील यांचे सुपुत्र अतुल पाटील, वहाळच्या साई संस्थानचे अध्यक्ष रविशेठ पाटील, माजी पं.स. सदस्य भाऊशेठ पाटील आदी उपस्थित होते.

या वेळी बोलताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी, रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील, कष्टकऱ्यांचे द्रष्टे नेते जनार्दन भगत आणि माता-पित्यांचे संस्कार व आशीर्वादांमुळेच आपण घडलो, असे सांगून सर्व नागरिकांना गणेशोत्सवाच्या आणि भावी जीवन सुखी-समृद्ध होवो अशा शुभेच्छा दिल्या.

आमदार महेश बालदी, 'रयत'चे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य डॉ. सदाशिवराव कदम आणि साई संस्थान वहाळचे अध्यक्ष रविशेठ पाटील यांनीही शुभेच्छापर मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील, माजी सरपंच हरिश्चंद्र म्हात्रे, गव्हाणच्या माजी सरपंच माई भोईर, माजी उपसरपंच विजय घरत, सचिन घरत, योगिता भगत, उषा देशमुख, कामिनी कोळी, नरेश मोकल, गणेश पाटील, वहाळचे माजी उपसरपंच अमर म्हात्रे, विश्वनाथ कोळी, जितेंद्र म्हात्रे, पनवेल पश्चिम मंडळ अध्यक्ष रूपेश धुमाळ, गव्हाण विभागीय अध्यक्ष निलेश खारकर, धीरज ओवळेकर, वितेश म्हात्रे, शैलेश भगत, निकिता खारकर, भाऊ भोईर, राजेश म्हात्रे, मिनाक्षी पाटील, सुहास भगत, सुधीर ठाकूर, मदन पाटील, अनुप भगत, अंकुश ठाकूर, किशोर पाटील, सचिनराजे येरूणकर, अखिलेश यादव, अवधेश महतो, वहाळ पं.स. अध्यक्ष वितेश म्हात्रे, युवा मोर्चा गव्हाण विभागीय अध्यक्ष शनिकुमार पाटील, मंडळ उपाध्यक्ष सुहास गोंधळी, जयवंत देशमुख, हेमंत ठाकूर, रतनशेठ भगत, शैलेश भगत, मदन पाटील, दीपक गोंधळी, ॲड. सुनील मौर्या, मनोज मोर्या, रयत शिक्षण संस्थेचे रायगड विभागीय अधिकारी मोहन कोंगेरे, सहायक विभागीय अधिकारी विलासराव जगताप, प्रिया शिंदे, संगीता कांबळे, अशा पाटील, अंकुश ठाकूर, अवनीश सिंह, रवी शिंदे, प्रणय कडू, नासिर खान, प्रतिश पाटील, निलेश खोत, विराज देशमुख, विनायक कोळी, समीर मढवी, देवालय मित्रा, गणेश पाटील, वनिता बाबर, अभिमन्यू दापोलकर, प्रवीण ठाकूर, हरी घरत, सागरशेठ ठाकूर, मुख्याध्यापक कारंडे, संतोष गुजर यांच्यासह सामाजिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवर, कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## निवडक

### भारत आणि जपान यांच्यात विविध करारांवर स्वाक्षरी

**टोकियो** : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या जपान दौऱ्यात तेथील पंतप्रधान शिगेरू इशिबा यांच्यासोबत १५व्या भारत-जपान शिखर परिषदेत व्यापार, गुंतवणूक आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानासह द्विपक्षीय संबंध मजबूत करण्यावर चर्चा केली. या शिखर परिषदेत दोन्ही देशांमध्ये अनेक करारांवर स्वाक्षरी करण्यात आली.

### रिलायन्स जिओचा आयपीओ पुढील वर्षी येणार -अंबानी

**मुंबई** : रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडच्या ४८व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत चेअरमन आणि व्यवस्थापकीय संचालक मुकेश अंबानी यांनी मोठी घोषणा केली. बहुप्रतिक्षित जिओचा आयपीओ २०२६च्या पहिल्या सहामाहीत आणला जाणार असल्याचे त्यांनी या वेळी जाहीर केले.

## रायगडात पावसाची संततधार



**अलिबाग : प्रतिनिधी**

गणेशोत्सव हा कोकणातील सर्वात मोठा उत्सव म्हणून ओळखला जातो, मात्र या काळात पावसाने हजेरी लावल्याने गणेशभक्तांच्या उत्साहावर विरजण पडले आहे. शुक्रवारीही (दि. २९) दिवसभर पावसाची संततधार सुरू होती.

गणेशोत्सवापूर्वी आठ दिवस रायगड जिल्ह्यात पावसाने दमदार हजेरी लावली होती. त्यानंतर दोन दिवस विश्रांती घेतल्यानंतर पावसाने पुन्हा बरसायला सुरुवात केली. जिल्ह्याच्या अनेक भागात अधूनमधून पावसाच्या सरी कोसळत आहेत. कधी रिमझिम, तर कधी जोरदार सरी बरसत आहेत. यामुळे खास गणेशोत्सवासाठी गावी आलेल्या गणेशभक्तांना घरात बसल्यावाचून पर्याय उरलेला नाही.

अनेक ठिकाणी गणपतीच्या आगमनावेळी तसेच काही ठिकाणी विसर्जन मिरवणुकीदरम्यान पावसाने हजेरी लावली. त्यामुळे अनेकांच्या बाप्पांचे आगमन आणि विसर्जन गाडीतूनच झाले. गणेशोत्सव काळात आलेले मुंबईकर आपल्या नातेवाईकांकडे गणपतीच्या दर्शनाला आवर्जून जात असतात. याशिवाय शहरी भागात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी केलेली आरास आणि देखावे लहान मुलांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू असतो, परंतु पावसाच्या संततधारेमुळे सध्या घराबाहेर पडणे होत नाहीये.

## महावाणिज्यदूतांनी घेतले मुख्यमंत्र्यांच्या बाप्पाचे दर्शन

**मुंबई : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या वर्षा या शासकीय निवासस्थानी विविध देशातील महावाणिज्यदूतांनी गणेशाचे दर्शन घेत मनोभावे आरती केली. मुख्यमंत्री आणि त्यांच्या सुविद्य पत्नी अमृता फडणवीस यांनी सर्व महावाणिज्यदूतांचे स्वागत केले.



फ्रान्सचे जीन मारे सेरे चार्लेट, ब्रिटीश उच्चायुक्तालयाचे राजकीय प्रमुख जॉन निकेल, मलेशियाचे अहमद झुवारी युसूफ, साउथ कोरियाचे डाँगवान यू, ब्राझिलचे जाओ दे मेंडोन्का लिमा नेतो, बांगलादेशच्या फरहाना अहमद चौधरी, इंडोनेशियाचे इडी वॉरडोयो, यूएईचे अब्दुल्ला हुसेन अल्मारझुकी, अर्जेंटिनाचे डॅनिअल क्यूर कन्फलोनिरी, श्रीलंकेचे प्रियंगा विक्रमसिंघे, इजिप्तचे दहिला तवाकोल, फिनलंडच्या इवा निल्सन, पोलंडचे थोमाझ, कतारचे अहमद साद अल सुलैती, मॉरिशसचे दुशांत बक्तोवार, इसराईलचे कोब्बी शोशनी, जपानचे कोजी यागी, युएसएचे मायकेल स्क्रेन्डर, टर्कीचे मुस्तफा केमालटीन युगूर, पनामाचे रॉबटो रॉड्रिग्ज प्रडा, इराकचे झुहायर साद अब्बास, कुवेतचे शाये अबू शायबा, ऑस्ट्रेलियाचे पौल मुर्फी, आर्यलँडचे टॉम नूनन, नेदरलँडचे नाबील तौती, बेलारूसचे अलिकसंदर मत्सूको, स्पेनचे जॉर्ज डी लुकास कॅडेनास, थायलंडच्या थितीपॉर्न चुचीन्नावट, स्वीडनचे उपमहावाणिज्य दूत जोकीम गुन्नारसन, स्विर्झलँडचे मॅथिअस कोएग्ल, सौदी अरेबियाचे सुलेमान ईद अलोतैबी, इटलीचे वॉल्टर फेरारा, मेक्सिकोच्या अड्रिना विल्लानेवा, चीनचे क्वीन जी, जर्मनीचे क्रिस्टोफ रेंडटॉर्फ, सिंगापूरचे जेरम वाँग, बहरिनचे अली अब्दुल अझीज अल बलुशी यांच्यासह अफगाणिस्तानचे महावाणिज्यदूत यांनी सहकुटुंब आरतीत सहभाग घेतला. गणेश दर्शन व आरतीनंतर फडणवीस दाम्पत्याने सर्वांची विचारपूस करीत चर्चा केली.

## गौरी पुजनासाठी सुपांना मागणी



**रेवदंडा : प्रतिनिधी**

गणरायापाठोपाठ येणाऱ्या गौरीला ओवसा देण्यासाठी पारंपरिक सुपांना मागणी वाढलेली दिसते. बांबूपासून बनवलेले सूप भाऊ हा गौरी गणपतीत बहिणीसाठी नेतो आणि बहीण त्याचा पाहुणचार करते, तर काही ठिकाणी नवीन नवरीला पाच सुपांचा ओवसा देण्याची पद्धत रूढ आहे.

सुपात फळे, वेगवेगळी फुले, दुर्वा, तुळस, आघाडा, पोळ्या, करंजी आदी साहित्याचा ओवसा गौरीला दिला जातो. या वेळी भाऊ बहिणीला साडीचोळी, बांगडीसाठी पैसे देतो. मग साजशृंगार, सौभाग्याचे लेणे परिधान करून महिला पतीच्या उदंड आयुष्याची प्रार्थना करून गौरीची ओटी भरतात. येत्या रविवारी गौरीचे आगमन व सोमवारी पूजन असल्याने बाजारात सुपांना मागणी आहे.

बुरूड समाजाच्या वतीने गणेशोत्सवातील गौरी पूजनासाठी सूप बनविले जातात. उत्सवापूर्वी सूप बनविण्याच्या प्रक्रियेस सुरुवात केली जाते. बाजारात सध्या बांबूपासून बनविण्यात येत असलेल्या सुपाचा १५० ते २०० रुपये असा दर आहे. बांबूच्या वाढत्या दरासह मजुरांची वाढलेली मजुरी यामुळे सूप बनविण्यासाठी बुरूड समाजाला ओढाताण करावी लागते.

सध्या रेवदंडा पंचक्रोशीत सातारा जिल्ह्यातील सूप बनविणारे कारागीर आले आहेत. येथील शेतकरी व बागायतदारांकडून बांबू खरेदी करून सूप बनविण्याची कला ते उपयुक्तपणे साकारतात. स्थानिक बाजारपेठेत या कारागिरांचे ठिकठिकाणी बस्तान दिसते. परिणामी स्थानिक बुरूड समाजाच्या सूप बनविण्याचा व्यवसायास स्पर्धक तयार झाले आहेत.



दै. रामप्रहर आणि मल्हार चॅनेलसोबत यंदाचा गणेशोत्सव साजरा करा...

गणेशोत्सव बुधवार, दि.27 ऑगस्टपासून सुरू झाला आहे. या पर्वणीत आपल्या गणपतीचा फोटो दै. रामप्रहर आणि मल्हार चॅनेलवर **विनामूल्य** प्रसिद्ध करण्यात येत आहे. त्यामुळे आपण आपल्या बाप्पाचा फोटो, सोबत **आपले नाव व पत्ता ramprahar@gmail.com या ई-मेल आयडीवर पाठवा.** फोटो चांगला असल्यास त्याला रामप्रहर आणि मल्हार चॅनेल या दोन्ही ठिकाणी विनामूल्य प्रसिद्धी देण्यात येईल.

राम प्रहर
दिवाळी २०२५
मुक्तछंद
मुक्तपणे व्यक्त होणारे विविध विषयांवरील लेख, कथा, कविता, व्यंगचित्र आणखी बरेच काही आपण यंदाच्या दिवाळी अंकात मांडणार आहोत. लेख आणि कथा यांना शब्दमर्यादा असेल ती सुमारे तीनशे ते पाचशे शब्दांपर्यंत. संपादक मंडळाला जे साहित्य सर्वार्थाने योग्य वाटेल त्याच साहित्याला प्रसिद्धी दिली जाईल. आपला मजकुर टाईप केलेली ओपन फाईल सोमवार, १५ सप्टेंबर २०२५पर्यंत दै. रामप्रहरच्या मेलवर पोहचणे आवश्यक आहे. हाताने लिहिलेले साहित्य स्वीकारले जाणार नाही.
चला तर लागूया कामाला...
ramprahar@gmail.com

# पनवेल महापालिकेच्या अभय योजनेंतर्गत शास्तीवर १५ सप्टेंबरपर्यंत ९० टक्के सूट

**पनवेल, : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागामार्फत करदात्यांना दिलासा देण्यासाठी 'अभय योजना' राबविण्यात येत आहे. नागरिकांच्या मागणीनुसार आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार या योजनेत शास्ती माफीसाठी दिलेली मुदत वाढविण्यात आली आहे. दिनांक १५ सप्टेंबर पर्यंत शास्तीवरती ९० टक्के सुट राहणार आहे. मालमत्ताधारकांना अभय योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात आले आहे. तसेच दिनांक ३१ ऑगस्ट पर्यंत मालमत्ताधारकांनी मालमत्ता कर भरल्यास यावर्षीच्या मालमत्ता करावर ५ टक्के सूट मिळणार आहे. नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन उपायुक्त स्वरूप खारगे यांनी केले आहे.

महापालिकेच्यावतीने करदात्यांना ई-बिल स्वीकारणे, डिजिटल पद्धतीने कर भरणे यासाठी प्रोत्साहित केले जात असून, असे केल्यास अतिरिक्त २ टक्के सवलतीचा लाभ मिळू शकतो. तसेच ऊर्जा बचत, जल पुनर्भरण, कचरा व्यवस्थापन, पर्यावरणपूरक उपक्रम यामध्ये सहभाग घेणाऱ्या करदात्यांना देखील २ टक्के सवलतीची तरतूद करण्यात आली आहे.

पनवेल महानगरपालिकेच्या panvelmc.org या अधिकृत संकेतस्थळावर तसेच PMC Tax App **आणि** Panvel Connect App द्वारे ऑनलाइन कर भरता येणार आहे. या योजनेचा लाभ घेऊन प्रलंबित कर तत्काळ भरावा, असे आवाहन आयुक्त उपायुक्त स्वरूप खारगे यांनी केले आहे.

### कर-मित्र चॅटबॉटची सुविधा

***नागरिकांना अधिक सोयीस्कर, वेगवान आणि पारदर्शक सेवा देण्यासाठी पनवेल महानगरपालिकेने 'कर-मित्र' चॅटबॉटचे नुकतेच लोकार्पण केले आहे. हा अत्याधुनिक चॅटबॉट मालमत्ता करदात्यांना घरबसल्या त्वरित माहिती, मार्गदर्शन आणि ऑनलाइन मदत पुरवेल.***

## दोन महिलांच्या दागिन्यांची लूटले

**पनवेल : वार्ताहर**

खारघर वसाहत परिसरात दोन महिलांच्या दागिन्यांची लूट झाल्याच्या घटना घडल्या आहेत .

खारघर, सेक्टर-३२ मधील ओवे कॅम्पमध्ये राहणाऱ्या वंदना दगडू साळुंखे (४६) या सेक्टर-३५ मधील हाईड पार्क सोसायटीच्या पाठीमागील रस्त्याने पायी चालत आपल्या कामावर जात होत्या. यावेळी त्यांच्या पाठीमागून मोटारसायकलवरुन आलेल्या दोघा लुटारूंनी वंदना साळुंखे यांच्या गळ्यातील १५ ग्रॅम वजनाची ७५ हजार रुपये किमतीची सोन्याची चेन खेचून पलायन केले. या घटनेनंतर वंदना साळुंखे यांनी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

तर दुसऱ्या घटनेत खारघर, सेक्टर-१२ मध्ये राहणाऱ्या मिना गायकवाड (५७) या शिलाई मशीनची मोटार दुरुस्ती करण्यासाठी नवरंग चौकात गेल्या होत्या. त्यानंतर त्या पायी चालत घरी परतत होत्या. याचवेळी त्यांच्या समोरुन मोटारसायकलवरुन आलेल्या एका लुटारुने मिना गायकवाड यांच्या गळ्यातील ७२ हजार रुपये किंमतीची सोन्याची बोरमाळ खेचुन पलायन केले. त्यानंतर त्यांनी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

## भाजप उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील यांचा वाढदिवस उत्साहात



**पनवेल : वार्ताहर**

भाजप उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस, माजी नगरसेवक पनवेल महानगरपालिका, संस्थापक अध्यक्ष जाणीव एक सामाजिक संस्था तसेच अभिनव युवक मित्र मंडळाचे कार्याध्यक्ष नितीन पाटील यांचा वाढदिवस मोठ्या उत्साहात शहरातील अभिनव युवक मित्र मंडळाच्या गणेशोत्सवाच्या मंडपात पक्षाच्या पदाधिकारी , कार्यकर्ते , मंडळाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांच्या उपस्थितीत केक कापून शुभेच्छा स्वीकारत साजरा करण्यात आला.

या वेळी भाजप पनवेल शहराध्यक्ष सुमित झुंजारराव, कोषाध्यक्ष प्रवीण मोरबाळे, सचिव रुपेश नागवेकर, उपाध्यक्ष प्रीतम म्हात्रे, सुहासिनी शिवणेकर, पत्रकार संजय कदम, मंडळाचे अध्यक्ष अल्पेश पाडावे, उमेश इमानदार, मयूर चिटणीस, सुधीर देसाई,राजा चव्हाण, राजू सावंत, शैलेश कदम, पूर्णेदू साळवी, तुषार कापरे, परेश बोरकर, संजय शेट्टी, प्रसाद कंधारे, संतोष लाड, दक्ष नागवेकर आदींसह नादस्फूर्ती व सामाजिक संस्था पथकातील वादक व नागरिक उपस्थित होते.

## लाचलुचपत प्रतिबंधक अप्पर पोलीस अधीक्षकपदी भागवत सोनवणे

**पनवेल : वार्ताहर**

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (एसीबी), ठाणे येथे अप्पर पोलीस अधीक्षक म्हणून भागवत सोनवणे यांनी नुकताच पदभार स्वीकारला आहे. त्यांनी संजय गोविलकर यांच्याकडून या पदाची सूत्रे हाती घेतली आहेत. संजय गोविलकर यांच्या कार्यकाळातही लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने अतिशय धाडसी कारवाया केल्या.

यापूर्वी श्री.सोनवणे हे महाराष्ट्र पोलीस दलात विविध महत्त्वाच्या पदांवर कार्यरत होते. त्यांच्याकडे गुन्हेगारी आणि भ्रष्टाचारविरोधी प्रकरणांचा तपास करण्याचा मोठा अनुभव आहे. त्यांनी नवी मुंबई येथील लाचलुचपत प्रतिबंधक विभागात पोलीस उप अधीक्षक पदावर धडाडीने काम केले आहे, ज्यामुळे त्यांना



भ्रष्टाचारविरोधी मोहिमांची सखोल माहिती आहे. तसेच सहायक पोलीस आयुक्त, पनवेल विभाग, नागपूर शहर, मुंबई शहर, नाशिक शहर तसेच महाराष्ट्रातील ग्रामीण भागातही उत्कृष्ट सेवा बजावली आहे. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस अधीक्षक शिवराज पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली अप्पर पोलीस अधीक्षक म्हणून श्री.सोनवणे यांच्या नियुक्तीमुळे प्रशासकीय कामकाजात अधिक पारदर्शकता येईल आणि लाचखोरीला रोखण्यासाठी सुरू असलेल्या मोहिमांना बळ मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

## नारळासह मोदकांचे दर वाढले

**पनवेल : वार्ताहर**

मागील तीन ते चार महिन्यांपासून बाजारात नारळाचा तुटवडा असल्याने भाव वधारले होते. त्यात आता गणेशोत्सवाच्या तोंडावर मागणीत आणखी वाढ झाल्याने घाऊक बाजारात नारळ दरात १५ ते २० टक्क्यांनी वाढ होऊन घाऊक बाजारात २८ ते ६५ रुपये प्रति नग नारळ विकला जात आहे. दुसरीकडे किरकोळ बाजारात ४० ते ७५ रुपये प्रति नग नारळ विकला जात आहे. त्यामुळे यंदा बाप्पासाठी लागणाऱ्या मोदकांना महागाईची झळ बसली आहे.

सणासुदीत प्रसाद, देवपूजा, मिठाई, मोदक या पदार्थांसाठी नारळ खोबऱ्याची मोठी मागणी असते. परंतु, यंदा नारळाची आवक घटली आहे. दक्षिणेतील राज्यात पावसाळ्यात उष्णता वाढल्यानं नारळ खराब होत त्यांना कीड लागली. त्यामुळे यंदा नारळाची आवक कमी झाली आहे. परिणामी, गणेशोत्सवामुळं नारळाची मागणी जास्त आणि आवक कमी असल्याने नारळाचे भाव दहा ते पंधरा रुपयांनी वाढले आहेत.



### नारळाचा तयार किसदेखील महाग

*नारळ महाग झाल्याने खोबऱ्याचा कीस ६०० ते ६५० रुपये प्रतिकिलो दराने मिळण्याचा अंदाज नारळ व्यावसायिकांनी व्यक्त केला आहे. यासोबतच मिठाई बनविताना देखील नारळाचा मोठ्या प्रमाणात वापर होतो. मात्र, नारळ महागल्याने नारळाचे मोदक, लाडू आणि मिठाईदेखील महाग झाली आहे.*

याशिवाय सुक्या खोबऱ्याची किंमत ४०० रुपये किलोपर्यंत गेली आहे. यंदा दक्षिणोत्तर राज्यांमध्ये जिथे एका झाडावर १०० नारळ येत होते, तिथे केवळ ५५ ते ६० नारळ मिळत असल्याने नारळाची आवक घटली आहे. त्यामुळे नारळ, खोबरे आणि खोबरेल तेलाचे भाव मोठ्या प्रमाणात वाढले आहेत . पनवेल बाजारात ३० ते ४५ रुपयांमध्ये मिळणारा नारळ आता २८ ते ६५ रुपये तर किरकोळ बाजारात ४० ते ७५ रुपये दराने विकला जात आहे. घरामध्ये वापरले जाणारे सुके खोबरे चारशे रुपये किलोपर्यंत पोहचले आहे. त्यामुळे यंदा बाप्पासाठी लागणारे मोदक बनविताना गृहिणांना आर्थिक झळ सोसावी लागत आहे.

## मोदकांसाठी सुवासिक तांदळाच्या पिठाला वाढती मागणी

**पनवेल : वार्ताहर**

२७ ऑगस्ट पासून बरोबरी बाप्पा विराजमान झाले आहेत. बाप्पाच्या सर्वांत आवडता नैवद्या म्हणजे मोदक असल्याने चाप्पांच्या आवडत्या उकडीच्या मोदकांना नैवेद्यांच्या हात मानाचे स्थान देण्यात येते. त्यामुळे उकडीच्या मोदकासाठी सुवासिक तांदळाच्या पिठाला चांगलीच मागणी वाढली आहे. त्यात अनेक गृहिणींद्वारे आजारातून सुवासिक तांदूळ खरेदी करून घरी पीठ तयार केले कत आहे.



यंदा आंबेमोहर तांदूळ मागच्या वर्षीच्या तुलनेत दुप्पटीने महागला आहे. आंबेमोहर तांदळाचे कमी उत्पादन, वाढलेला उत्पादन खर्च, शेतकरी आणि विक्रेत्यांकडून मिळणारा जास्त नफा, कमी शेतजमीन उपलब्ध असल्याने आणि इतर पारंपरिक धान्यांपेक्षा आंबेमोहर तांदळाची मागणी जास्त असल्याने, आंबेमोहर तांदळाच्या किमतीत वाढ झाली आहे. आंबेमोहर तांदूळ पिकवणारे शेतकरी आता कमी झाले आहेत. त्यामुळे आंबेमोहर तांदळाचे एकूण उत्पादन कमी झाले आहे. तांदूळ पिकवण्यासाठी लागणारा खर्च वाढला आहे. यामुळे शेतकऱ्यांना जास्त नफा मिळवण्यासाठी किमत वाढवावी लागते.

याशिवाय आंबेमोहर तांदूळ सुहासिक असल्याने आंबेमोहर तांदळाला मागणी अधिक आहे, मोदक बनविण्यासाठी इंद्रायणी, बासमती तांदळाच्या पिठाचा वापर देखील केला जात आहे बाजारात सुवासिक इंद्रायणी, बासमती तांदूळ जरी महाग असले तरी त्यांची विक्री अधिक केली जाते. रेडिमेड उकडीचे मोदक महाग मिळत असल्याने अनेक महिला पीठ विकत घेऊन घरच्या घरीच मोदक बनवतात, त्यासाठी बासमती, आंबेमोहर आणि इंद्रायणी तांदळापासून पीठ बनवून ठेवले जात आहे. काही महिला नुसत्या तांदळाच्या पिठाची उकड काढतात, मात्र, सुहासिक तांदळाच्या पिठापासून तयार केल्या जाणाऱ्या मोदकाची चव आणि सुगधे करली छानच असल्याने आंबेमोहर, बासमती तांदळाला मागणी वाढली आहे. चिकटपणासाठी इंद्रायणी तांदूळही खरेदी केले जातात. दोन्ही तांदूळ एकत्रित केल्यामुळे पीठ मऊ आणि सुवासिक होऊन उकड चांगली होते. या उकडीपासून केलेले मोदक चवीसाठी उत्कृष्ट लागतात, असे गृहिणीकडून सांगितले जाते.

काही ठिकाणी आंबेमोहर तांदळाच्या रेडिमेड पिठाची विक्री केली जाते. काही भाविक बाप्पाला रोज उकडीच्या मोदकांचा नैवेद्य अर्पण करतात. त्यामुळे रेडिमेड मोदक खरेदी करणे शक्य नसल्याने थेट सुवासिक तांदूळ दळून त्याचे घरच्या घरी मोदक बनविण्यासाठी अधिक प्राधान्य दिले जाते. इंद्रायणी आणि बासमती तांदळाने दर कमी असून देखील आंबेमोहर तांदळाच्या पिठात्ताच मागणी वाढली आहे. राज्यातील एकमेव पुणे जिल्ह्यात आंबेमोहर आणि इंद्रायणी तांदळाचे पीक घेतले जाते. भोर, वेल्हे, मुळशी, मावळ या भागातील आंबेमोहर तांदळाला सर्वत्र मोठी मागणी आणि पसंती आहे. बाजारपेठेतील तांदळाचे दर आंबेमोहर तांदूळ ७५ ते १५० रुपये प्रतिकिलो, इंद्रायणी तांदूळ ६५ ते ७० रुपये प्रतिकिलो, बासमती तांदूळ ८० ते १५० रुपये प्रतिकिलो असे आहे .

## उसर्लीचा तरुण कलाकार, मिलिंद बाचलचे पुनरागमन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यात उसर्ली मध्ये रहाणार मुळचा सोलापुर जिल्ह्यातील पाटकूल सारख्या ग्रामीण मातीतून उगवलेला तरुण कलाकार, मिलिंद बाचल,यांचे चार वर्षांच्या प्रतीक्षेनंतर पुन्हा दिग्दर्शनात नव्या जोमाने धडाकेबाज पुनरागमन झाले आहे

'एक दिवसात बाप्पा मोरया ' आणि ' बाप्पाची टमा ' ही दोन गाणी रिलीज करण्याचा अनोखा प्रयोग मिलिंद यांनी करून दाखवून प्रेक्षकांना आनंदाची मेजवानीच दिली आहे मिलिंद यांनी मास मीडियाचे शिक्षण घेतले असून लहानपणापासूनच त्यांना चित्रपट क्षेत्राची आवड होती. आणि पाटकूल सारख्या ग्रामीण भागात राहूनही अगदी कमी वयातच युवा दिग्दर्शक म्हणून स्वतःला सिद्ध केले.

समाजातील संवेदनशील प्रश्नांवर त्यांनी अनेक गाणी बनविली आहेत की जेणेकरून त्यातून समाजापर्यंत योग्य तो संदेश पोहोचावे आणि समाजाने त्यातून काहीतरी चांगले शिकावे ही त्यांची खरी तळमळ दिसून येते. सोलापूर, पुणे, पनवेल, नाशिक अशा निरनिराळ्या भागात जाऊन मिलिंद बाचल यांनी अनेक गाणी चित्रित केली असून सिनेश्रुष्टितील स्पर्धेच्या युगात संघर्ष करत असलेल्या अनेक मुलामुलींना त्यांनी पुढे जाण्यास संधी दिली आहे.



दिग्दर्शनच नाही तर त्यासोबत ते उत्तम लेखक, आणि संकलक सुद्धा आहेत. शेतकरीगीत, शिवगीत प्रेमागीत, लावणी, विठ्ठल भक्तीगीत अशा विविध विषयांवर त्यांनी गाणी केली आहेत. मायबोली, आणि संगीत मराठी या चॅनेल्सवर त्यांची गाणी गाजत आहेत. दिग्दर्शन क्षेत्रापासून काही काळ दूर राहून पुन्हा नव्या जोमाने प्रेक्षकांच्या भेटीस आलेला हा युवक आपल्या आगळ्या वेगळ्या शैलीतून आणि ग्रामीण रसरशीत भावनेतून पुन्हा एकदा सर्वांची मन जिंकणार यात तिळमात्र शंका नाही.

'बाप्पा मोरया' आणि 'बाप्पाची टमा' या दोन गाण्यानी नुसते दिग्दर्शन क्षेत्रात पुनरगमनच केले असे नाही तर त्यांनी यात छोटीशी भूमिकाही निभावल्या आहे

## पनवेलमध्ये ब्रिजच्या कठड्यावरून पडून अज्ञात इसमाचा मृत्यू

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमध्ये झोपेत ब्रिजच्या पिल्लरच्या कठड्यावरून पडुन एक इसम जखमी झालेल्या अवस्थेत पनवेल शहर पोलिसांना मिळून आल्याने त्यास ॲम्बुलन्सने उपजिल्हा रूग्णालय, पनवेल येथे नेले असता, तेथील डॉक्टरांनी त्यास तपासून मयत झाल्याचे घोषीत केले असून त्याच्या नातेवाईकांचा शोध पनवेल शहर पोलीस करीत आहेत . अनोळखी बेवारस इसम वय अंदाजे वय ३५ ते ४० वर्ष, रंग गोरा, उंची अंदाजे ५ फुट ५ इंच, चेहरा उमट अंगाने मध्यम, डोक्याचे केस काळे, दाढी मिशीचे केस काळे वाढलेले, अंगात नेसुन फुलाची बारीक डिझाईन असलेला हाफ बाहयाचा शर्ट व काळसर रंगाची फुल पॅन्ट अशा वर्णनाचा आहे . या इसमा बाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस किंवा पोलीस उपनिरीक्षक राहुल डोळस यांच्याशी संपर्क साधावा .



**पनवेल : इंग्लिश नियतकालिक 'सिटी बेल'च्या गणेशोत्सव विशेषांकाचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. समूह संपादक मंदार दोंदे आणि विवेक पाटील संपादित या इंग्रजी विशेषांकचे प्रकाशन करताना लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी संपादक जोडीचे अभिनंदन केले तसेच वाचनीय लेख प्रसिद्ध केल्याबद्दल कौतुक केले.**

## पनवेल शहरातील दीड दिवसाच्या बाप्पांना निरोप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक परंपरेनुसार, गणेशोत्सवाचा उत्साह पनवेल शहरात शिगेला पोहोचला आहे. गणेश चतुर्थीच्या दिवशी स्थापन करण्यात आलेल्या अनेक दीडदिवसांच्या गणपती बाप्पांचे विसर्जन गुरुवारी मोठ्या उत्साहात पार पडले.

पनवेल शहरातील वडाळे तलाव आणि पनवेल कोळीवाडा येथील विसर्जन स्थळी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. गेले दोन दिवस शहरातील प्रत्येक घराघरात गणपती बाप्पांच्या आगमनाने एक वेगळाच आनंद निर्माण झाला होता.

गुरुवारी दीड दिवसाच्या बाप्पाला निरोप देण्यासाठी भाविकांनी सकाळपासूनच तयारी सुरूकेली होती. वाजतगाजत, आणि गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर या च्या घोषणांनी पनवेल शहर दुमदुमून गेले होते. पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील पनवेल, कामोठे, कळंबोली, खारघर या चारही प्रभागात सुमारे ८ हजार ३१० दीड दिवसाच्या घरगुती गणपतींचे शांततेत विसर्जन करण्यात आले. यावर्षी महापालिकेच्या बांधकाम विभागाच्या वतीने एकूण १३४ ठिकाणी विसर्जनाची सोय करण्यात आली आहे.

यामध्ये ५८ ठिकाणी नैसर्गिक विर्सजन ठिकाणे असून ७६ ठिकाणी कृत्रिम तलावांची विसर्जनासाठी सोय करण्यात आली आहे. सुरक्षा रक्षक, विद्युत व्यवस्था, सीसीटीव्हीची सुविधा उपलब्ध आहे.

## कंटेनरमधील मालाची चोरी

**पनवेल :** एका ट्रेलर वर असलेल्या कंटेनर चे अज्ञात चोरटयांनी कोणत्यातरी हत्यारांनी सील व लॉक तोडून कंटेनर मधील लाखो रुपये किमतीचा माल चोरून नेल्याची घटना पनवेल जवळील जेएनपीटी ते पळस्पे महामार्गालगत असलेल्या मामाचा ढाबा , भंगारपाडा येथे घडली आहे . अरविंद सिंग यांच्या मालकीच्या ट्रेलर वर असलेल्या कंटेनरचे अज्ञात चोरटयांनी कोणत्यातरी हत्यारांनी सील व लॉक तोडून लाखो रुपये किमतीचा माल चोरून नेला

## लॅपटॉपसह मोबाईलची चोरी

**पनवेल :** राहत्या रूमच्या उघड्या दरवाज्या वाटे कोणीतरी अज्ञात इसमाने रूममध्ये प्रवेश करून तेथे असलेले लॅपटॉप , मोबाईल व पैशाचे पाकीट चोरून नेल्याची घटना शहरातील लाईन आळी येथे घडली आहे . विवेक पुजारी रूम नंबर २०५ , यश प्लाझा बिल्डिंगमधील त्यांच्या रूमच्या उघड्या दरवाज्या वाटे कोणीतरी अज्ञात इसमाने रूममध्ये प्रवेश करून तेथे असलेले लॅपटॉप , मोबाईल व पैशाचे पाकीट चोरून नेल्याची घटना घडली आहे . याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे .

## संपादकीय

# आघाडीकडे जगाचे लक्ष

रशिया, भारत आणि चीन या तिन्ही देशांनी एकमेकांच्या साथीने अमेरिकेच्या प्रभावापासून दूर असलेली आघाडी मजबूतपणे दाखवण्याची संधी 'शांघाय सहकार्य संघटने'च्या माध्यमातून मिळते आहे. त्यामुळेच या संघटनेची परिषद सध्या आंतरराष्ट्रीय चर्चेचा विषय बनली आहे. वादाचे मुद्दे आणि कटुता बाजूला ठेवून सध्याच्या परिस्थितीत भारत आणि चीन एकमेकांची साथ कशी देतात ते येत्या काळात दिसेल.

**'शांघाय सहकार्य संघटने'च्या (एससीओ) परिषदेसाठी चीनचे राष्ट्राध्यक्ष क्षी जिनपिंग यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांना व्यक्तीश: निमंत्रित केल्याची चर्चा होत होती. आता पंतप्रधान मोदी आणि चीनचे अध्यक्ष जिनपिंग यांच्यातील प्रत्यक्ष भेट निश्चित झाली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे टॅरिफच्या माध्यमातून भारत, रशिया आणि चीनवर दबाव निर्माण करत असताना आशिया खंडात ही मोठी घडामोड घडत आहे. लवकरच चीनचे राष्ट्राध्यक्ष क्षी जिनपिंग, भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन हे एकाच मंचावर दिसू शकतात. सध्याच्या जागतिक व्यापारसंघर्षाच्या पार्श्वभूमीवर या भेटीविषयी जगभरात उत्सुकता आहे. सात वर्षांनंतर मोदी आणि जिनपिंग यांची भेट होणार आहे. २०२० साली गलवान खोऱ्यात उभय देशांमध्ये झालेल्या संघर्षानंतर मोदी यांचा सात वर्षांतील हा पहिलाच चीन दौरा आहे. मोदी आणि जिनपिंग रविवारी, ३१ ऑगस्टला भेटतील. व्यापार आणि इतर सहकार्य वाढवण्यासोबतच, अमेरिकेने लागू केलेल्या व्यापार शुल्कावरही या भेटीत चर्चेची शक्यता आहे. यापूर्वी रशियात झालेल्या ब्रिक्स परिषदेत २०२४ साली मोदी आणि जिनपिंग एकत्र दिसले होते. युक्रेन-रशिया युद्धाच्या पार्श्वभूमीवर रशियावर पाश्चिमात्य देशांनी निर्बंध लादले होते. तरीही ब्रिक्स परिषदेत मोदी आणि जिनपिंग यांनी पुतीन यांच्यासोबत मागच्या वर्षी ब्रिक्स परिषदेत सहभाग घेतला होता. आताही शांघाय सहकार्य संघटनेच्या एससीओ परिषदेत रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन हेही सहभागी होणार असल्यामुळे या परिषदेला जागतिक स्तरावर महत्त्व आहे. चीनमधील तिआनजिन येथे 'शांघाय सहकार्य संघटनेची' ही शिखर परिषद होत आहे. या परिषदेचा प्रारंभ येत्या रविवारपासून होणार असून ती येत्या सोमवारपर्यंत चालेल. परिषदेत २० देशांचे प्रमुख नेते सहभागी होणार असून पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या शनिवारी त्याकरिता चीनकडे प्रयाण करतील. अमेरिकेच्या व्यापार शुल्क धोरणावर परिषदेतील नेत्यांदरम्यान उघड झाली नाही तरी प्रत्यक्ष भेटींमध्ये निश्चितच चर्चा होईल असे जगभरातील आंतरराष्ट्रीय संबंध व व्यापारविषयक तज्ज्ञांचे मत आहे. शांघाय सहकार्य परिषदेचा विस्तार करण्याच्या दृष्टीनेही या संमेलनात धोरणनिश्चिती होण्याची शक्यता आहे. त्यातूनही जगाला एक महत्त्वाचा संदेश मिळणार आहेच. रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन आणि चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांच्यातही या परिषदेच्या निमित्ताने भेट होईल. सध्या चीन हा रशियाच्या कच्च्या तेलाचा सर्वात मोठा खरेदीदार देश आहे, तर भारत रशियाकडून तेलखरेदी करत असल्याच्या कारणावरून अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर २५ टक्के अतिरिक्त टॅरिफ लादल्यामुळे अमेरिकेकडून भारतावर लावण्यात येणारे एकूण टॅरिफ ५० टक्क्यांवर पोहोचले आहे. यामुळे जगातील सर्वाधिक शुल्क लादलेल्या देशांच्या यादीत भारताचा समावेश झाला. चीनवरही ट्रम्प यांनी आधी असाच अवाजवी टॅरिफ लावला होता. या पार्श्वभूमीवरच भारत, चीन, रशिया एकाच मंचावर येण्याला आंतरराष्ट्रीय महत्त्व प्राप्त झाले आहे.**

# संस्कारक्षम पिढी घडवणारा मराठी विभाग

सातारा येथील छत्रपती शिवाजी कॉलेजच्या मराठी विभागात २००२ ते २००४ या काळात पदवीव्युत्तर पदवीसाठी (एमए) प्रवेश घेतला होता. तसं माझं शालेय शिक्षण आणि पदवीपर्यंतचे शिक्षण हे ग्रामीण भागात झाले आहे. माझं मूळ गाव सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यात केवड म्हणून आहे. पदवीपर्यंतचे शिक्षण संस्थेच्याच माढा कॉलेजमध्ये झाले. पुढे एमए करायचे निश्चित होते, पण प्रवेश कुठे घ्यायचा हे निश्चित नव्हते, कारण माझी आर्थिक परिस्थिती नाजूक होती. एखाद्या शहरातील कॉलेजमध्ये प्रवेश घेऊन वसतिगृहात राहून शिकण्याची आर्थिक कुवत अजिबात नव्हती. त्यावेळी आताचे शिवाजी कॉलेजचे विभागप्रमुख डॉ. सुभाष वाघमारे माढा कॉलेजला होते. त्यांनी कर्मवीरांच्या कमवा व शिका योजनेची माहिती दिली. पुढे त्यांच्याच मार्गदर्शनाने सातारच्या ज्ञानभूमीत पाऊल ठेवले आणि कमवा व शिका योजनेतून एमए च्या शिक्षणाला सुरुवात झाली.

छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये एमए करीत असताना खूप शिकायला मिळाले. सातारची माती ज्याच्या पायाला लागते त्याचे सोनं होतं असं म्हणतात ते खरं आहे. रुढार्थाने ऐहिक संपत्तीपासून आज चार कोस दूर असेल, पण कर्मवीरांच्या या ज्ञान संकुलात जे संस्कार मिळाले. ते ऐहिक संपत्तीपेक्षा खूप मौल्यवान आहेत. आज त्या मूल्यांच्या आणि संस्काराच्याच जोरावर आनंदी, समाधानी आणि स्वाभिमानी जीवन जगत आहे. याचा मला फार अभिमान वाटतो. माझ्या जडणघडणीमध्ये कमवा शिका योजनेचा व छत्रपती शिवाजी कॉलेजमधील सर्वच शिक्षकवृंदाचा खूप मोलाचा वाटा आहे. त्या प्रत्येक गुरुजनांचे योगदान मला कदापि विसरता येणार नाही.

२००२ ते २००४ या काळात प्रा.डॉ. नलिनी महाडिक मराठी विभागाच्या प्रमुख होत्या. तर डॉ. हेमलता गायकवाड, डॉ. शुभांगी भूतकर, डॉ. शिवाजी पाटील, डॉ. अनंत सोनावणे, डॉ. मीरा देठे हे प्राध्यापक आम्हाला एमएला शिकवत, तर डॉ. शिवलिंग मेनकुदळे, डॉ. कांचन नलवडे आणि डॉ.पांडुरंग भोसले हे प्राध्यापक गेस्ट लेक्चरर म्हणून आम्हाला शिकवायला यायचे. त्यावेळी विद्यार्थीसंख्या खूप होती. आज ते वेगवेगळ्या क्षेत्रात नोकरी करीत आहेत. यामध्ये मराठी विभागाचे योगदान खूप महत्त्वाचे आहे.

डॉ. नलिनी महाडिक आज सेवानिवृत्त आहेत. त्यांची शिकवण्याची पद्धत खूप छान होती. त्या आम्हाला लोकसाहित्य हा पेपर शिकवत, बहिणाबाईंच्या कविता गाऊन शिकवत. प्रत्येक पद्यपंक्तीचा अर्थ त्या विस्ताराने आणि विविध उदाहरणे सांगून पटवून देत असत. राज्यस्तरीय वक्तृत्व स्पर्धेसाठी त्यांनी मला खूप प्रोत्साहान दिले, मार्गदर्शन केले. त्यांच्या पाठिंब्यामुळे मी अनेक ठिकाणी वक्तृत्व स्पर्धेला गेलो. त्यामुळे माझे वक्तृत्व कौशल्य विकसित झाले.

डॉ. भूतकर आम्हाला साहित्य आणि समाज हा पेपर शिकवत. त्या खूप प्रेमळ स्वभावाच्या होत्या. विद्यार्थ्यावर त्या कधीच रागवत नसत. जे सांगायचे आहे, शिकवायचे आहे ते प्रेमाने आणि मायेने सांगत. डॉ. हेमलता गायकवाड आम्हाला मराठी वाङ्मयाचा इतिहास हा पेपर शिकवत. त्यांच्या शिकवण्यामध्ये खूप बारकावे आणि सूक्ष्म संदर्भ येत. वेगवेगळ्या चर्चासत्र, कार्यशाळेमध्ये ते हमखास एखादा प्रश्न उपस्थित करीत. त्यामुळे प्रश्न कसा उपस्थित केला पाहिजे, हे मला त्यांच्याकडून शिकता आले.

डॉ. अनंत सोनवणे फार कमी दिवस मराठी विभागात होते. पुढे त्यांची बदली झाली. ते आम्हाला एका लेखकाचा अभ्यास-साने गुरुजी शिकवत. त्यांचीही शिकवण्याची पद्धत खूप छान आणि आकर्षक होती. साने गुरुजींचे व्यक्तिमत्व मांडत असताना, ते अनेक संदर्भ देत. त्यातून लेखकाची जडणघडण कशी झाली, त्यांच्या साहित्याची निर्मिती कशी झाली. या सर्व गोष्टी आम्हाला सहजपणे कळून येत असत.

डॉ. शिवलिंग मेनकुदळे आम्हाला आधुनिक मराठी साहित्य शिकवत असत. त्यांचे मराठी भाषेवर प्रभुत्व आहे. अनेक कवींच्या कविता त्यांच्या तोंडपाठ असत. त्यामुळे शिकवताना अनेक कवींच्या कविता आमच्या कानावर पडत. त्यापैकीच एक चाफा बोलेना, चाफा चालेना ही त्यांची खूप आवडती कविता. आम्ही मन लावून ऐकत असू. मेनकुदळे सर ज्या ज्या वेळी लेक्चरला येत असे. त्या त्या वेळी ते अभ्यासपूर्ण अध्यापन करीत असत. त्यांच्या अध्यापनाचा प्रभाव आजही माझ्यावर आहे.

डॉ. शिवाजी पाटील हे आम्हाला भाषाविज्ञान पेपर शिकवत. त्यांचीही शिकवण्याची पद्धत खूप छान होती. वेगवेगळे संदर्भ ते अचूकपणे देत असत. संशोधन लेख तयार करताना कोणकोणत्या गोष्टीची काळजी घेतली पाहिजे, संदर्भ कसे दिले पाहिजेत, लेखन निसंदिग्ध होण्यासाठी कोणत्या गोष्टी महत्त्वपूर्ण ठरतात.याविषयी ते अचूक मार्गदर्शन करत. कॉलेजच्या शिवविजय नियतकालिकाचे ते संपादक होते. शिवविजयचा अंक आजही आपण बारकाईने पाहिला तर मुखपृष्ठापासून ते मलपृष्ठापर्यंत आणि अनुक्रमणिकेपासून ते आतील आशय मांडणीपर्यंचे बारकावे खूप काही शिकवतात. ते कोणतेही गोष्ट अभ्यासपूर्वक, नियोजनपूर्वक आणि प्रयत्नपूर्वक करीत असत. पुढे योगायोगाने ते माझे एमफिल आणि पीएचडीचे मार्गदर्शक झाले. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच मला विद्यापीठ अनुदान आयोगाकडून राजीव गांधी नॅशनल फेलोशिप मिळाली. याचे मला खूप समाधान वाटते. पीएच.डी. पदवी घोषित झाल्यानंतर, त्यांनी ५ सप्टेंबर रोजी शिक्षकदिनी २५ हजार रुपये ऑनलाईन पाठवून माझ्या पीएचडी पदवीचा गौरव केला होता. असे गुरुवर्य मला शिवाजी कॉलेजला मिळाले.

मराठी विभागात आमच्या काळात संशोधनावर आधारित चर्चासत्र, कार्यशाळा, अभ्याससहली होत असत. त्यामुळे वेगवेगळे अनुभव येत असत तसेच कमवा शिका योजनेत असल्यामुळे श्रमाचे महत्त्वही पटत गेले. छत्रपती शिवाजी कॉलेजमधील कमवा व शिका योजना ही गरीब व गरजू विद्यार्थ्यासाठी मोठी वरदायिनी आहे. मी कमवा शिका योजनेत असताना अनेक प्रकारची कामे केली. डोक्यावर पाटी घेऊन भाजी विकणे, म्हशी राखणे, एसटीडी बुथवर काम करणे, संस्था कार्यालयात काम करणे, संस्थेचे पदाधिकारी यांच्या घरी साफसफाईची कामे करणे अशी पडेल ती कामे मी केली. या कामातून मला लोकसंपर्क वाढवता आला. नवीन नातेसंबंध तयार करता आले. त्यांच्याकडून चांगले सल्ले मिळाले. आजघडीला जे काही हातात आणि अस्तित्वात आहे त्यामध्ये छत्रपती शिवाजी कॉलेजच्या मराठी विभागाचे आणि कमवा शिका योजनेचे खूप मोठे योगदान आहे.

मराठी विभागातून साहित्याचे आणि भाषेचे ज्ञानार्जन करता आले. तर कमवा शिका योजनेतून मूल्यशिक्षण जगता आले. जुने दिवस, जुन्या आठवणी स्मरण करताना मन खूप भरून येते. त्या काळात आपण किती समृद्ध अनुभव घेतले आहेत. याची आज जाणीव होते.

आजचे विद्यमान विभागप्रमुख डॉ. सुभाष वाघमारे यांचेही मला मोलाचे मार्गदर्शन माढा कॉलेजला असताना लाभले. त्यांनी मला पहिल्यांदा कॉलेजच्या वार्षिक स्नेहसंमेलनात सूत्रसंचालक म्हणून जबाबदारी दिली. ती जबाबदारी मी चांगल्या रीतीने पार पाडण्याचा प्रयत्न केला. तिथे मला माझ्यातला सूत्रसंचालक शोधता आला. आतापर्यंत संस्थेच्या ज्या ज्या कॉलेजमध्ये मी काम केले आहे किंवा करतो आहे तिथे मला विविध कार्यक्रमाच्या सूत्रसंचालकाचे काम देण्यात आले. त्यामुळे डॉ. वाघमारे यांचा मी आभारी आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली १९४७ ते २०२५पर्यंतचा मराठी विभागाचा इतिहास लिखित स्वरूपात लिहिण्याचा उपक्रम निश्चितच नव्या पिढीला दिशादर्शक ठरेल. मराठी विभागाचा एक विश्वसनीय दस्तऐवज म्हणून आकाराला येईल आणि अनेक पिढ्यांना तो मार्गदर्शक आणि प्रेरणादायी ठरेल यात शंका नाही. डॉ. वाघमारे आणि त्यांच्या टीमने हे काम मोठया जोमाने, नेटाने आणि परिश्रमपूर्वक केले. त्याबद्दल त्यांचे आणि संपूर्ण टीमचे अभिनंदन करतो.

मराठी विभागाने आज खूप नवनवीन प्रकल्प राबवले आहेत. प्रयोगशाळा सुरू केल्या आहेत. स्मृतीदालने तयार केली आहेत. संशोधनाचे महत्व लक्षात येण्यासाठी राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर चर्चासत्रे व कार्यशाळा आयोजित केल्या आहेत. परदेशी व परराज्यातील विद्यापीठाशी सांमजस्य करार केले आहेत. ही आनंददायी गोष्ट आहे, परंतु पुढील काळात मराठी विभागातील विद्यार्थीसंख्या टिकून राहण्यासाठी, विभागाला नवीन आव्हाने स्वीकारून वाटचाल करावी लागणार आहे. विद्यार्थी व्यावसायाभिमुख होण्यासाठी अधिक प्रयत्न होणे अपेक्षित आहे. कथात्म साहित्य, संतसाहित्य, भाषासाहित्य अभ्यासून जीवन कसे जगावं हे कळेल, पण जीवनाचे ईप्सित साध्य होईलच हे खात्रीने सांगता येणार नाही. त्यासाठी व्यावसायिक मूल्यशिक्षण देणे आवश्यक ठरणार आहे. त्यामुळे आतापासूनच त्यादृष्टीने पावले टाकली, तर येणाऱ्या पुढील पिढीलाही व्यावसायाभिमुख व संस्कारक्षम शिक्षण मिळेल आणि त्यांचे जीवन यशस्वी होईल. त्यासाठी खूप शुभेच्छा आणि सदिच्छा!

**-डॉ. आबासाहेब सरवदे,**
**कर्मवीर भाऊराव पाटील कॉलेज,**
**वाशी (नवी मुंबई)**



## बदलते तंत्रज्ञान

# एआयमुळे 'या' नोकऱ्यांवर झाला सर्वाधिक परिणाम!

सध्या सर्वच क्षेत्रात एआयचा मोठ्या प्रमाणात वापर सुरू आहे. एआयमुळे अनेकांची कामे सोपी झाली आहेत, तर या एआयमुळे अनेकांच्या नोकऱ्याही धोक्यात आल्या आहेत. स्टॅनफोर्ड विद्यापीठाच्या एका नवीन अभ्यासानुसार २२ ते २५ वयोगटातील मुला-मुलींना नोकरी मिळण्याची शक्यता कमी झाली आहे. विशेष ज्युनियर कोडर, कस्टमर सपोर्ट आणि एन्ट्री-लेव्हल ऑफिस जॉब्समध्ये तीन वर्षांत नोकऱ्या १३%ने कमी झाल्या आहेत.




दुसरीकडे ज्यांना आधीच चांगला अनुभव आहे त्यांना एआयमुळे कोणतेही नुकसान झालेले नाही, उलट त्यांचे काम सोपे झाले आहे. म्हणजेच अनुभवी लोकांना फायदा होत आहे आणि तरुणांना तोटा होत आहे. आजचे तरुण केवळ पदवी घेऊन व्यवस्थापन करू शकणार नाहीत, त्यांना नवीन कौशल्ये शिकावी लागतील आणि एआयसोबत काम करायला शिकावे लागेल.

पूर्वी नोकऱ्यांमध्ये नवीन येणाऱ्यांना बेसिक कोडिंग, डेटा एंट्री किंवा ग्राहकांचे कॉल हाताळणे अशी छोटी कामे दिली जात होती. आता तेच काम एआय टूल्सद्वारे केले जात आहे. जसे की गिटहब कोपायलट, चॅटबॉट्स. याचा थेट परिणाम २२-२५ वयोगटातील नवीन नोकऱ्या करणाऱ्यांवर झाला आहे. नोकरी सुरू करण्यापूर्वीच त्यांना बेरोजगारीचा सामना करावा लागत आहे. ज्युनियर सॉफ्टवेअर डेव्हलपर्सच्या नोकऱ्या सर्वात जास्त धोक्यात आहेत. पूर्वी कंपन्या बेसिक कोडिंग करण्यासाठी एखाद्याला कामावर ठेवत असत, परंतु आता एआय टूल्स काही सेकंदात तेच काम करू शकतात. नवीन कॉम्पुटर सायन्स पदवीधरांना चांगल्या तंत्रज्ञानाच्या नोकऱ्या मिळत नाहीत. अनेकांना रेस्टॉरंटमध्ये काम करणे किंवा पार्सल पोहोचवणे यासारख्या तंत्रज्ञानाव्यतिरिक्त इतर कामे करावी लागत आहेत, असे अहवालात असे दिसून आले.

एआय टूल्स वापरायला शिका आणि तुमचे काम सोपे करा. फक्त तांत्रिक कौशल्येच नाही तर सॉफ्ट स्किल्स देखील शिका. समस्या सोडवणे, टीमवर्क, कम्युनिकेशन सारखे. नवीन कौशल्ये शिकत रहा. डेटा सायन्स, सायबर सिक्युरिटी, क्लाउड टेक्नॉलॉजी यासारख्या क्षेत्रात भविष्य अधिक सुरक्षित आहे. ओपन सोर्स आणि फ्रीलान्सिंगमधून अनुभव मिळवा. यामुळे फायदा होईल.

# संगीतकार दशरथ पुजारी



## निमित्त

गेल्या शतकाच्या सुवर्णकाळात मराठी संगीतविश्वात एक असा कलाकार होऊन गेला, ज्याच्या सुरांनी रसिकांच्या मनावर अजरामर गारूड केले. त्याच्या स्वरांनी आणि संगीतरचनांनी एक नवा अध्याय लिहिला. त्याच्या संगीताच्या अद्वितीय प्रवासाची सुरुवातही तितकीच अनोखी होती. मराठी सुगम संगीतात तब्बल ३५० गाण्यांना चाली देणारे, मनाच्या गाभ्यात घर करून राहिलेले आणि आजही त्यांच्या सुरेल गाण्यांनी मराठी मनाला भुरळ घालणारे अजरामर संगीतकार तथा गायक दशरथ पुजारी!


दशरथ धनकोडी पुजारी यांचा जन्म ३० ऑगस्ट १९३० रोजी बडोदा येथे झाला. त्यांचे आई-वडील सुरुवातीला मुंबईत वास्तव्यास होते, मात्र योगायोगाने बडोद्याच्या राजांच्या व्याह्यांवर उपचार करण्याकरिता ते बडोद्याला गेले. पुजारी यांचे शालेय शिक्षण मुंबईतील युनियन हायस्कूलमध्ये झाले, तेव्हा ते गिरगाव भागात राहत होते. पुढे त्यांनी बार्शी येथे स्थलांतर केले आणि तिथेच त्यांना शास्त्रीय गायक गोपाळ भातंबरेकर यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांच्या शेजारी राहण्याचा लाभ घेत पुजारींनी संगीताचा गाढा अभ्यास केला. संगीताचा वारसा लाभलेले पुजारी यांना गायक म्हणून सुरुवातीला संधी मिळणं कठीण जात होतं. गायनाबाबत आत्मविश्वास नव्हता, त्यामुळे भावगीत गायला त्यांनी नकारही दिला होता. पण पुढे ते सुधीर फडके, गजानन वाटवे यांच्या तोडीचे गायक व संगीतकार बनले. 'श्रीराम घनश्यामा' आणि 'हास रे मधु हास ना' ही दोन गीते त्यांनी संगीतबद्ध केली, जी प्रमोदिनी देसाई यांच्या आवाजात अजरामर झाली. याच क्षणापासून त्यांच्या संगीतकार म्हणून वाटचालीला सुरूवात झाली. १९५२ साली आकाशवाणीची स्वरचाचणी देऊन ते नियमित गायला लागले आणि त्यांच्या नावाचा ठसा संगीतविश्वात उमटू लागला.

पुजारी यांनी अनेक अवीट गोडीच्या गाण्यांना चाली दिल्या, ज्या आजही रसिकांच्या मनात घर करून आहेत. 'अजून त्या झुडुपांच्या मागे', 'आठवे अजुनी यमुना तीर', 'सदाफुली दोघांना हसते' अशी त्यांच्या नावाशी कायम जोडली गेलेली गाणी. त्यांनी भावगीते, भक्तिगीते, युगुलगीते आणि अभंग या सर्वच प्रकारात अप्रतिम संगीत दिले. 'झिमझिम झरती श्रावणधारा', 'अशीच अमुची आई असती', 'चल ऊठ रे मुकुंदा', 'केशवा, माधवा, तुझ्या नामात रे गोडवा', 'मृदुल करांनी छेडित तारा' ही त्यांची अविस्मरणीय गाणी आहेत. विशेष म्हणजे, वसंत देसाईंनी रचलेल्या 'माणुसकीच्या शत्रूसंगे' या समरगीताचे पहिले रेकॉर्डिंग पुजारी यांनीच आकाशवाणीसाठी केले होते. पुजारी यांनी संगीतकार म्हणून अनेक नवोदितांना संधी दिली. त्यांचा आवाज आणि संगीत दिग्दर्शन कौशल्यामुळे आकाशवाणीच्या माध्यमातून त्यांचे नाव घराघरात पोहोचले. त्यांच्या प्रतिभेचा गौरव म्हणून त्यांना 'कवी पी. सावळाराम प्रतिष्ठेचा पुरस्कार' तसेच 'चतुरंग संगीत सन्मान' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. त्यांचे आत्मचरित्रपर पुस्तक 'अजून त्या झुडुपांच्या मागे' हे त्यांच्या संगीतमय प्रवासाचा साक्षीदार आहे.

१३ एप्रिल २००८ रोजी दशरथ पुजारी यांचे निधन झाले. त्यांच्या सुरांची जादू आजही अबाधित आहे. अश्या संगीतक्षेत्रातील अवलिया संगीतकार दशरथ पुजारी यांना पुण्यतिथि निमित्त विनम्र अभिवादन!

**-श्रीकांत जोशी (आणि क्रिएटिव्ह टीम)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# दगदगीत पायदुखीवर 'हे' उपाय करा...

गौरी- गणपतीचा सण प्रत्येक घरात प्रचंड आनंद आणि उत्साह घेऊन येतो. याशिवाय या दिवसांत घरातल्या प्रत्येकाच्या मागचीच कामं खूप जास्त वाढलेली असतात. त्यात स्त्रियांच्या मागची कामं तर विचारून नका. अगदी सजावटीपासून ते नैवेद्यापर्यंत प्रत्येक आघाडीवर त्यांना सगळं सांभाळून घ्यावं लागतं. हे सगळं करताना प्रचंड दमछाक होते.



दिवसभर उत्साहाच्या भरात काही जाणवत नाही, पण रात्री मात्र अंथरुणाला पाठ टेकली की मग थकल्यासारखं होतं. त्यात काही जणींचे पाय तर खूप जास्त दुखतात. पोटऱ्यांमध्ये गोळे येऊन ते ओढल्यासारखे होतात. यामुळे मग रात्री शांत झोपही येत नाही. हा त्रास कमी करण्यासाठी या काही खास टिप्स...

पोटऱ्या दुखत असतील तर काय उपाय करावे?

* सणासुदीच्या काळात कामाची धावपळ असल्याने अनेक जणींचे खाण्या-पिण्याकडे लक्ष नसते. असं करू नका. व्यवस्थित जेवण करा आणि भरपूर पाणी प्या. पाणी कमी प्यायल्यामुळेही अंगातली ताकद कमी होते आणि पाय दुखतात.
* पाय खूप दुखत असतील तर आहारातले पोटॅशियम वाढवा. केळी खाणे हा पोटॅशियम वाढविण्याचा एक उत्तम उपाय आहे.
* रात्री झोपण्यापूर्वी तिळाचं तेल किंवा मोहरीचं तेल थोडं गरम करा आणि त्याने पोटऱ्यांना वरून खाली यापद्धतीने मसाज करा. मसाज केल्यामुळे तेथील रक्तपुरवठा सुरळीत होतो आणि पोटऱ्या दुखणं कमी होतं.
* विपरित करणी, ताडासन या पद्धतीचे पायांचे आणि विशेषत: पोटऱ्यांचे स्नायू ताणले जातील असे व्यायाम करा. यामुळेही पोटऱ्यांच दुखणं कमी होण्यास मदत होते.
* तुमच्या आहारात जर कॅल्शियम आणि मॅग्नेशियमयुक्त पदार्थ कमी प्रमाणात असतील तर त्यामुळेही पोटऱ्यांचा त्रास वाढतो. यासाठी हिरव्या पालेभाज्या, तीळ, सुकामेवा, सब्जा, चिया सीड्स, ताजी फळं असे पदार्थ खाण्याचं प्रमाण वाढवा.

(टीप : घरगुती उपचार करूनही वेदना थांबत नसतील, तर डॉक्टरांचा सल्ला घ्या.)

# जुनी वाहने खरेदी-विक्रीची माहिती पोलिसांना देणे अनिवार्य

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्ह्यात दहशतवादी कारवाया व गंभीर गुन्ह्यांमध्ये चोरीच्या वाहनांचा वाढता वापर लक्षात घेता जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी कडक आदेश जारी केला आहे.

यापुढे जिल्ह्यातील सर्व नगरपालिका व ग्रामपंचायत हद्दीत जुनी वाहने खरेदी-विक्री करणाऱ्या व्यावसायिकांना वाहनांचा संपूर्ण तपशील स्थानिक पोलीस ठाण्यात नोंदवणे बंधनकारक असेल. या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २२३ अन्वये दंडात्मक कारवाई करण्यात येणार आहे.

पोलीस अधीक्षक यांनी दिलेल्या अहवालानुसार, जिल्ह्यात जुन्या वाहनांच्या खरेदी-विक्रीचा मोठ्या प्रमाणावर व्यवसाय सुरू आहे. वाहन दुरुस्तीची दुकाने, लहान गॅरेज तसेच खासगी व्यापाऱ्यांकडून मोटारसायकली व इतर वाहने विक्रीस येत असतात. परंतु या व्यवहाराचा सविस्तर तपशील न ठेवला गेल्याने चोरीच्या वाहनांची देवाणघेवाण वाढत आहे. देशातील विविध दहशतवादी कारवायांमध्ये चोरीच्या मोटारसायकलींचा वापर झाल्याची उदाहरणे नोंदली गेली आहेत. गंभीर गुन्हे उघडकीस आणताना पोलिसांना वाहनांच्या मालकांचा व खरेदीदारांचा तपशील उपलब्ध नसल्याने तपासात अडचणी येतात.

जुनी वाहने खरेदी-विक्री करणाऱ्या व्यावसायिकांनी प्रत्येक सात दिवसांनी स्थानिक पोलीस ठाण्याला व्यवहाराचा तपशील द्यावा. या तपशिलात वाहन क्रमांक, इंजिन क्रमांक, चेसिस क्रमांक, मूळ मालकाचे नाव, कायमचा व सध्याचा पत्ता, मोबाईल क्रमांक, ओळखपत्र, आरसीटीसी बुक यांचा समावेश असणे बंधनकारक राहील. खरेदीदाराचे नाव, पत्ता, मोबाईल क्रमांक व ओळखपत्राची माहिती देणे देखील आवश्यक असेल.

या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात कठोर कारवाई करण्यात येईल. यात दंड तसेच इतर शिक्षेची तरतूद आहे.

हा निर्णय सामान्य नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि कायदा सुव्यवस्थेच्या दृष्टीने घेतला असून त्यामुळे जुनी वाहने खरेदी-विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांनी नियमांचे पालन करावे असे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी कळविले आहे.

# घर, दुकान, फ्लॅट भाड्याने दिल्यास माहिती पोलिसांना देणे बंधनकारक

**रायगड, : रामप्रहर वृत्त**

जिल्ह्यातील नागरिकांनी आपली घरे, दुकाने, फ्लॅट, फार्म हाऊस भाड्याने देताना किंवा विक्री करताना भाडेकरू व खरेदीदारांची संपूर्ण माहिती स्थानिक पोलीस ठाण्यात कळविणे बंधनकारक राहणार आहे. यासंदर्भात जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केला आहे.

पोलीस अधीक्षक यांच्या अहवालानुसार, जिल्ह्यातील औद्योगिक वसाहती, फार्म हाऊस व शहरी भागात मोठ्या प्रमाणावर परप्रांतीय नागरिक नोकरी, व्यवसाय किंवा इतर कारणास्तव राहण्यासाठी घरे व फ्लॅट भाड्याने घेत आहेत. परंतु, याबाबत मालकांकडून स्थानिक पोलीस ठाण्यात वेळेवर माहिती दिली जात नसल्याचे समोर आले आहे. त्यामुळे गुन्हेगारी किंवा दहशतवादी कारवाया घडल्यास तपासात अडथळे निर्माण होतात. यापूर्वीही रायगड परिसरातून भाडेकरू म्हणून राहणाऱ्या नक्षलवाद्यांना अटक झाल्याच्या घटना घडल्या आहेत. भविष्यात अशा प्रकारच्या घातपाती कारवायांना प्रतिबंध घालण्यासाठी प्रत्येक भाडेकरू किंवा खरेदीदाराची माहिती पोलीस स्टेशनकडे असणे अत्यावश्यक असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

नवीन आदेशानुसार मालमत्ता धारकांनी भाडेकरू अथवा खरेदीदार यांची नावे, पत्ते, संपर्क क्रमांक, ओळखपत्र व इतर संपूर्ण माहिती भाडेकरार किंवा विक्री झाल्यानंतर सात दिवसांच्या आत संबंधित पोलीस ठाण्यात देणे बंधनकारक असेल. आदेशाचे उल्लंघन केल्यास संबंधितांविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम २२३ अंतर्गत दंडनीय कारवाई होणार आहे.

हा आदेश २६ ऑगस्टपासून पुढील दोन महिन्यांपर्यंत लागू राहणार आहे. माहिती पोलीस ठाण्यात नोंदवावी

# पालीतील अंबिके कुटुंबाचा पर्यावरणपूरक गणेशोत्सव

## जागतिक वारसा मिळालेल्या किल्ल्यांचा देखावा

**पाली : प्रतिनिधी**

दरवर्षी घरगुती गणेशोत्सवातून सामाजिक संदेश देणाऱ्या अंबिके कुटुंबाने या वर्षी 'गजर गणरायाचा, सन्मान महाराष्ट्राच्या अस्मितेचा' या संकल्पनेतून एक अनोखा देखावा साकारला आहे. जागतिक वारसा समितीने भारताच्या मराठा साम्राज्यातील लष्करी बांधणीच्या १२ किल्ल्यांना जागतिक वारसा दर्जा दिला आहे. याच ऐतिहासिक घटनेचा धागा पकडत कुटुंबाने या १२ किल्ल्यांची भव्य प्रतिकृती आपल्या घरात उभारली आहे.



या देखाव्यात महाराष्ट्रातील ११ आणि तामिळनाडूमधील एका किल्ल्याचा समावेश आहे. या किल्ल्यांची छायाचित्रांसह माहिती, जागतिक वारसा मिळवण्याचा प्रवास आणि त्याचे फायदे, अशा अनेक गोष्टींचे दर्शन या देखाव्यातून घडते. जागतिक वारसा मिळाल्यामुळे या किल्ल्यांचे महत्त्व वाढले असून, त्यांचे संवर्धन आणि जतन करणे आता आपल्या सर्वांची जबाबदारी बनली आहे.

अंबिके कुटुंबाने या देखाव्यासाठी खास काव्यपंक्तींच्या पताका आणि तोरणे तयार केली आहेत. 'शिवबाचे जन्मस्थान शिवनेरी गाथा, तुमच्या चरणाशी नतमस्तक बाप्पा मोरया माझा माथा,' अशा अनेक काव्यपंक्तींनी हा देखावा अधिक प्रभावी बनला आहे. या देखाव्याला भेट देणाऱ्यांसाठी किल्ल्यांची सखोल माहिती देणारा अभ्यासपूर्ण ऑडिओ देखील उपलब्ध आहे. या ऑडिओच्या माध्यमातून प्रेक्षकांना प्रत्येक किल्ल्याचा इतिहास आणि महत्त्व समजून घेता येते.

हा केवळ देखावा नसून, एक सामाजिक संदेश आहे. 'जुने किल्ले, नवी दिशा, इतिहासाची जपूया प्रतिष्ठा' यांसारख्या घोषवाक्यांद्वारे अंबिके कुटुंबाने गडसंवर्धनाचे आवाहन केले आहे. या देखाव्याच्या माध्यमातून त्यांनी गडकिल्ल्यांचे महत्त्व आणि त्यांचे जतन करण्याची आवश्यकता अधोरेखित केली आहे. देखाव्यातील विविध मावळ्यांची सजावट आणि त्यांचे पोशाख पाहताना, आपण थेट इतिहासात पोहोचल्याचा अनुभव मिळतो.

अंबिके कुटुंबाने त्यांच्या गणेशोत्सवाच्या माध्यमातून इतिहासाचे महत्त्व, सामाजिक जाणीव आणि पर्यावरणाचे रक्षण यांसारख्या मूल्यांना एकत्र आणले आहे. हा देखावा केवळ डोळ्यांना आनंद देत नाही, तर प्रत्येकाला आपल्या ऐतिहासिक वारशाबद्दल अभिमान वाटायला लावतो.

सदर देखाव्यासाठी साहित्य हे पर्यावरणपूरक व गणपतीमूर्ती शाडू मातीची आहे.

# शतायुषी परंपरा असलेल्या केंद्रांकडून अनोख्या थीम्सद्वारे श्रद्धा आणि वारसा उजागर



**खोपोली : रामप्रहर वृत्त**

टाटा पॉवरच्या खोपोली व भिरा जलविद्युत केंद्रात यंदा गणेशोत्सव भक्तीभावाने आणि उत्साहात साजरा करण्यात आला. खोपोली व भिरा या दोन्ही शतायुषी परंपरा असलेल्या केंद्रांनी अनोख्या थीम्सद्वारे श्रद्धा आणि वारसा उजागर केला. खोपोली जलविद्युत केंद्रात केदारनाथ थीमवर सजवलेले देखावे विशेष आकर्षण ठरले.

या माध्यमातून श्रद्धा आणि जलविद्युत वारशाच्या शंभर वर्षांहून अधिक परंपरेला उजाळा देण्यात आला, तर भिरा जलविद्युत केंद्रात गडाच्या थीमवर सजवलेला देखावा साकारण्यात आला होता. ऐतिहासिक वारशाला उजाळा देणारा हा उपक्रम भाविकांना आकर्षित करणारा ठरला आहे.

धार्मिक भावनेची ताकद आणि ऐतिहासिक प्रेरणेची जाणीव या दोन्हींचा संगम साधत, टाटा पॉवरच्या केंद्रातील गणेशोत्सवाने श्रद्धा, संस्कृती आणि वारशाची उज्ज्वल परंपरा पुढे चालवली आहे.


**पनवेल महानगरपालिका**
ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६

**जाहिर सुचना**

पनवेल महानगरपालिकेमार्फत देण्यात येणाऱ्या ७० लोकसेवा अधिसुचित करणेकरीता या लोकसेवांची यादी पनवेल महानगरपालिकेच्या www.panvelcorporation.com या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आली आहे. तरी सदरच्या लोकसेवांच्या यादीमध्ये नागरिकांच्या काही हरकती असल्यास १५ दिवसांच्या आत दिनांक १५/०९/२०२५ पूर्वी पनवेल महानगरपालिकेच्या सामान्य प्रशासन विभागात सादर कराव्यात.

जा.क्र. पमपा/ जनसंपर्क./३१२५/ प्र.क्र.४२१/४२८/२०२५
दिनांक :- २९/०८/२०२५

सही/-
उपायुक्त (मुख्यालय)
पनवेल महानगरपालिका.



**महाराष्ट्र शासन राजपत्र**
**असाधारण भाग चार-ब**

वर्ष ११, अंक ११३ बुधवार, ऑगस्ट ६, २०२५/ श्रावण १५, शके १९४७ ( पृष्ठे ७, किंमत : रुपये ९.०० )

**असाधारण क्रमांक २८८**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**उद्योग, ऊर्जा, कामगार व खनिकर्म विभाग,**
**मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०००३२,**
**दिनांक ६ ऑगस्ट, २०२५**
**सूचना**

**महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१.**

क्रमांक आयडीसी २०२१/प्र.क्र.४६/उद्योग-१४. ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा महाराष्ट्र तीन) यांच्या कलम १, पोट-कलम (३) अन्वये उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, आयडीसी २०२१/प्र.क्र.४६/उद्योग-१४, दिनांक २७ मे, २०२२ रोजी निर्गमित करण्यात आलेली अधिसुचना, महाराष्ट्र शासन साधारण राजपत्र, भाग चार-ब, दिनांक २-८ जून २०२२, पृष्ठ क्र. १ ते ९ वर प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. उपरोक्त अधिनियमाच्या प्रकरण सहाचे उपबंध हे त्या अधिसूचनेत नमूद केलेले मौजे पानसई, कोशिंबळे तर्फे निजामपूर, कालवण, भाले, कांदळगाव, बोंडशेत, जावटे, तालुका माणगांव, तसेच मौजे पाथरशेत, तालुका रोहा, जिल्हा रायगड येथील क्षेत्रास दिनांक २ जून २०२२ या तारखेपासून लागू करण्यात आलेले आहेत व उक्त क्षेत्र हे उक्त अधिनियमाच्या कलम २ खंड (ग) अन्वये, औद्योगिक क्षेत्र, म्हणून जाहीर करण्यात आलेले आहे;

आणि ज्याअर्थी, उपरोक्त अनुसूचीमध्ये जाहीर केलेल्या जमिनी त्याभागात समाविष्ट आहेत. (यापुढे याचा उल्लेख उक्त जमीन असा करण्यात येईल.);

आणि, ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकरीता उक्त जमिनी औद्योगिक क्षेत्र म्हणून विकासासाठी या जागेची आवश्यकता असल्याचे राज्य शासनाचे मत आहे;

आणि, ज्याअर्थी उक्त जमिनीच्या जमीन मालकांचे व त्यात हितसंबंध असलेल्या व्यक्तींचे म्हणपो अधिनियमांच्या कलम ३२ चे पोट-कलम (२) प्रमाणे ऐकून घेतलेले आहे व त्यानुसार महाराष्ट्र शासनाने या कलमाच्या ३२ चे पोट-कलम (१) च्या अनुषंगाने उक्त जमीन संपादन करण्याचा निर्णय घेतला आहे;

त्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिताः विकास अधिनियम, १९६१ चे कलम ३२(१) चा वापर करून सदर जमिनी उपरोक्त कारणासाठी संपादीत केल्या असल्याबद्दलची ही नोटीस महाराष्ट्र शासन या कलमा अन्यये प्राप्त अधिकारांचा वापर करून प्रसिद्ध करीत आहे.

**अनुसूची**
**मौजे पाथरशेत, तालुका रोहा, जिल्हा रायगड.**

| अ.क्र. | गट नंबर | हिस्सा नंबर | क्षेत्र (हे.आर.) |
|---|---|---|---|
| १ | १५४. | ० | ०.००२ |
| २ | १५५ | ० | ०.५१९ |
| ३ | १५६ | ० | ०.१४० |
| ४ | १५७ | ० | ०.११८ |
| ५ | १५८ | ० | ०.६७० |
| ६ | १५९ | ० | ०.३११ |
| ७ | १६० | ० | ०.००५ |
| ८ | १६१ | ० | ०,१२७ |
| | | **एकूण** | **१.८९२** |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
डॉ. श्रीकांत पुलकुंडवार,
शासनाचे सहसचिव.

दिनांक : २९/०८/२०२५
क्र. जिमाका/रायगड/जाहिरात/१३६/१५७/२०२५


# पर्यावरणपूरक गणेश विसर्जनासाठी पाली नगरपंचायतीतर्फे कृत्रिम तलावाची निर्मिती

**पाली : प्रतिनिधी**

पर्यावरणपूरक गणपती विसर्जनासाठी पाली नगरपंचायत तर्फे पाली आगर आळी येथील एसबीआय बँके समोरील मोकळ्या मैदानात कृत्रिम तलावाची निर्मिती करण्यात आली आहे. त्याचबरोबर पाली नगरपंचायतने आपला उत्सव आपली जबाबदारी या थीमखाली मार्गदर्शक सूचना सुद्धा दिल्या आहेत.

नगरपंचायत मार्फत सूचना देण्यात आल्या आहेत की पर्यावरण पूरक विसर्जनासाठी कृत्रिम तलावाचा वापर करा. प्लास्टर ऑफ पॅरिस (झजझ) व




रासायनिक रंग वापरलेली तीन फुटावरील गणपती मूर्ती कृत्रिम तलावात विसर्जित करू नयेत. फुल, हार, नारळ, सजावट साहित्य इ. वेगळ्या दिलेल्या निर्माल्य कलशामध्ये टाका.

मूर्तीचे विसर्जन तलावात शांतपणे करा, ढकलाढकली करू नका. प्लास्टिकच्या पिशव्या, थर्माकोल पाण्यात टाकू नयेत. सुरक्षेकरिता नगरपंचायत कर्मचाऱ्यांच्या सूचनांचे पालन करा. लहान मुलांना तलावाच्या काठाजवळ एकटे सोडू नका. कृत्रिम तलावात साबण, डिटर्जंट, तेल ओतू नका. मूर्ती विसर्जन केल्यानंतर परिसर स्वच्छ ठेवा. स्वच्छता राखा - पर्यावरण वाचवा असे नगरपंचायत मार्फत आवाहन करण्यात आले आहे.

# तळा शहरातील हेमाडपंथी बांधणीचे गणेश मंदिर

**तळा : प्रतिनिधी**

तळा शहरातील मधल्या आळीतील हेमाडपंथी बांधणीचे प्राचीन मंदिर असून भक्तांची मनोकामना पूर्ण होते ,असे नवसाला पावणारे प्रसिद्ध श्रीगणेश मंदिर आहे.



मुंबई-गोवा हायवे पासून अंदाजे १४ की.मी.अंतरावरती तळा शहरात आल्यानंतर बाजारपेठेतून गो.म.वेदक विद्यामंदिराकडून श्रीगणेश मंदिरात जाता येते तळा शहरातील हे प्रसिद्ध मंदिर असून हे मंदिर परिसर निसर्गाने नटलेला असून प्रसन्न व आनंददायी वातावरण ,शांत व शीतलता लाभून मन प्रसन्न, प्रफुल्लित होऊन शांतता लाभते, मंदिरात प्रवेश केल्यानंतर मनातील विकार दूर होऊन मनांतील इच्छापूर्ती होते. असे येथे येणारे भक्त आपले अनुभव सांगताना ऐकावयास मिळत आहेत.

या मंदिरात श्रीगणेउत्सवात भाविक श्रीगणेश चतुर्दशीच्या दिवसा पासून ते अनंत चतुर्दशी पर्यंत भक्तगण अधिक प्रमाणात दर्शन घेण्यासाठी येत असतात.या उत्सवात या मंदिराला विशेष असे महत्व आहे.तसेच श्रीगणेशजयंतीला मोठा उत्सव साजरा केला जातो.दर संकष्टी चतुर्थीलाही भक्तगण दर्शनाला मोठ्याप्रमाणात येतात.नवसाला पावणाऱ्या या श्रीगणेश मंदिराला भक्तगण दर्शन घेण्यासाठी वाढत असल्याचे चित्र पहावयास मिळत आहे.




पनवेल : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या शिवाजीनगर येथील निवासस्थानी विराजमान गणरायाचे रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य प्रा.डॉ. सदाशिवराव कदम, प्रकल्पग्रस्तांचे झुंझार नेते दिवंगत दि.बा. पाटील यांचे पुत्र अतुल पाटील, सचिन गायकवाड आदींनी दर्शन घेतले.



पनवेल : उद्योजक राजू गुप्ते यांच्या निवासस्थानी विराजमान गणपती बाप्पाचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांनी दर्शन घेतले. सोबत ज्येष्ठ नेते वाय.टी. देशमुख.



सचिन तांडेल, मोहोपाडा



चंद्रकांत साठे, उरण



शशिकांत ठोंबरे, पळस्पे, ता.पनवेल



ग्रामपंचायत सदस्य सुजित पाटील, कासारभाट, पनवेल



उमेश पाटील, बारापाडा, ता.पनवेल



प्रशांत रमेश तांबोळी, मोहोपाडा, ता.खारपाडा



सुशील ठाकूर, केळवणे,ता. पनवेल



जीवन राजाराम म्हात्रे, दिघाटी, ता.पनवेल



जाधव परिवार, खांदा कॉलनी, पनवेल



संजय सीताराम म्हस्कर, मोहोपाडा, ता.खालापूर



लिलेश्वर ठाकूर, भेंडखळ, ता.उरण



अनिल जाधव, चिरनेर, ता.उरण



भाजप महिला मोर्चा उरण तालुका अध्यक्ष राणी म्हात्रे, गोवठणे

# गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर टाटानगर रस्त्याचे काम मार्गी



**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

आमदार मंदा म्हात्रे यांनी नागरिकांच्या समस्या गांभीर्याने लक्षात घेत सिबिडी टाटानगर मधील रस्त्याचे काम तातडीने मार्गी लावले आहे.

सीबीडी टाटानगर येथील रस्त्याची पावसाळ्यात दुरावस्था झाली होती. दुचाकी वा चारचाकी वाहन घेऊन जाणे मुश्किल झाले होते. येथील रस्त्यांची दुरवस्था लक्षात घेता गणेशोत्सव काळात गणेश मूर्तींच्या विसर्जनास तसेच नागरिकांच्या दैनंदिन कामात अडथळे निर्माण होण्याची शक्यता होती.

रस्त्याची दुरुस्ती करण्यात यावी असे साकडे आ. मंदा म्हात्रे यांना येथील रहिवाशांनी घातले होते. रहिवाशांची ही समस्या तातडीने मार्गी लागण्यासाठी आमदार मंदा म्हात्रे यांनी नवी मुंबई महानगरपालिका बेलापूर विभागीय अधिकारी डॉ. अमोल पालवे यांच्याशी थेट संपर्क साधून आवश्यक निर्देश दिले. त्यांच्या पुढाकारामुळे विभागीय अधिकाऱ्यांनी त्वरित हालचाली करून रस्त्याचे काम सुरु करून ते मार्गी लावले.

या कार्यवाहीमुळे टाटानगर परिसरातील गणेशोत्सव निर्विघ्न आणि सुरळीत पार पाडण्यास मदत होणार आहे.

# कळंबोलीत दीड दिवसाच्या ११५० गणेशमूर्तींचे विसर्जन

**कळंबोली : बातमीदार**

कळंबोली परिसरातील दिवसाच्या गणपतीचे सासृ नयनाने ,ढोल ताशाच्या गजरात ,फटाक्याच्या आतषबाजीत, हरिनामाचा विठु रायाचा गजर करत विविध ठिकाणी महापालिकेने तैनात केलेल्या तलावांमध्ये भावपूर्ण श्रद्धांजली गणेश मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. कळंबोली पोलिसांच्या अकत्यारित असलेल्या विविध ठिकाणी मिळून जवळपास ११५० दीड दिवसांच्या गणेश मूर्तींचे विसर्जन झाल्याची माहिती देण्यात आली आहे. याकरता महापालिका आणि सर्व यंत्रणा सज्ज ठेवली होती. तर अग्निशामक दल यंत्रणाही आपल्या जवानांसह सज्ज झालेली दिसून आली.

कळंबोली परिसरात, कळंबोली गाव ,रोडपाली गाव, खिडुकपाडा, कळंबोली वसाहत या मध्ये घराघरातून भक्ती भावाने स्थानापन्न केलेल्या गणेश मूर्तींचे आज मोठ्या वाजत गाजत ढोल ताशाच्या गजरात विसर्जन ही करण्यात आले. याकरता पनवेल महापालिकेच्या वतीने सर्व यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली होती. रोडपाली तलावाजवळ महापालिकेने तलाव व त्याच्या आजूबाजूचा परिसर सीसीटीव्हीच्या कक्षेत ठेवण्यात आलेला दिसून आला. या ठिकाणी मोठ्या क्रेनचिही



व्यवस्था करण्यात आली होती. विसर्जन स्थळी हायमास्ट व मोठमोठे दिव्यांची व्यवस्था ही मोठ्या प्रमाणावर करण्यात आली होती. तसेच भाविकांकडून आलेल्या निर्माल्य हे तलावात न टाकता एका मोठ्या कलशांमध्ये साठवण्यात आले. या ठिकाणी महापालिकेचे अधिकारी वर्गही आवर्जून उपस्थित होते .विसर्जन प्रक्रियेमध्ये कळंबोली अग्निशामक दलाचे प्रमुख मनीष ब्राह्मणकर हे आपल्या चार जवानांसह विसर्जन स्थळे सज्ज झालेले दिसून आले. तर कळंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कोते यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाण्यातील दोन पोलीस अधिकारी व १५ पोलीस कर्मचारी हे वाहतूक यंत्रणा व सुरक्षा यंत्रणा चोख ठेवण्यासाठी तैनात झाले होते. अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने रोडपाली तलावाजवळील विसर्जन व्यवस्था महापालिकेकडून चांगल्या पद्धतीत केल्याने नागरिकांनी ही महापालिकेला धन्यवाद दिले आहेत.

कळंबोली तील रोडपाली तलाव, वालदेश्वर, खिडकपाडा तसेच कळंबोली गावातील तलावामध्ये ही मोठ्या संख्येने दीड दिवसाच्या गणपतीचे विसर्जन करण्यात आले. महापालिकेच्या वतीने रोडपालीतील सेक्टर २०, वीज वितरण कार्यालयाजवळ व छत्रपती शिवाजी महाराज क्रीडांगण मध्ये कृत्रिम तलावाची निर्मिती ही गणेश विसर्जनासाठी करण्यात आली होती. अनेक भाविकांनी या कृत्रिम तलावाचाही वापर गणेश मूर्तींचे विसर्जन करण्याकरता केलेला दिसून आला. कळंबोली वसाहतीमध्ये दीड दिवसाच्या गणरायाचे मूर्तीचे अत्यंत भावपूर्ण व श्रद्धेने शिस्तबद्ध पद्धतीत विसर्जन करण्यात आले. यावेळी कळंबोली पोलिसांनी चोख सुरक्षा व्यवस्था तैनात केली होती.

# डॉ. अजिंक्य पाटील यांची नियुक्ती

**पनवेल : वार्ताहर**



हिंदुहृदयसम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आशीर्वादाने व धर्मवीर आनंद दिघे यांच्या कर्तृत्वाला स्मरूण तसेच शिवसेना पक्ष प्रमुख एकनाथ शिंदे (उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य) व खा. डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार डॉ. अजिंक्य प्रकाश पाटील यांची शिवसेना डॉक्टर सेल महाराष्ट्र प्रदेश अंतर्गत कोकण विभाग (जिल्हा रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग) प्रमुख पदी नियुक्ती करण्यात आली आहे.

या नियुक्तीचा कालावधी तीन वर्षाचा असेल. वंदनीय हिंदुहृदयसम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा हिंदुत्वाचा विचार व धर्मवीर आनंद दिघे यांची शिकवण व एकनाथ शिंदे आणि खा. डॉ. श्रीकांत एकनाथ शिंदे यांच्या जनहित कार्याचा प्रचार व प्रसार कराल तसेच पक्षवाढीसाठी आपण सर्वांना सोबत घेऊन कार्य कराल असा विश्वास आहे. असा विश्वास महाराष्ट्र राज्य डॉक्टर सेल प्रदेशप्रमुख डॉ. धनंजय गोविंदराव पडवळ यांनी नियुक्ती पत्र देताना व्यक्त केला आहे.

# पनवेल रेल्वे पोलीस करणार बेवारस मोबाईल्सचा लिलाव

**कळंबोली: रामप्रहर वृत्त**



विविध गुन्ह्यात विविध ठिकाणी बेवारस स्थितीत सापडलेले अनेक मोबाईल पनवेल रेल्वे पोलिसांच्या ताब्यात आहेत. या मोबाईलचे अद्याप पर्यंत कोणीच मालक उपलब्ध न झाल्याने अखेरीस ३० ऑगस्टला पनवेल रेल्वे पोलीस या बेवारस मोबाईलचा कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून लिलाव करणार असल्याचे पनवेल लोहमार्ग पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय तायडे यांनी जाहीर केले आहे.

पनवेल लोहमार्ग पोलीस ठाण्याच्या आखतारित पनवेल रेल्वे पोलिसांना विविध गुन्ह्यात किंवा बेवारस स्थितीत अनेक मोबाईल आढळून आलेले आहेत .या मोबाईलचे मालक शोधण्याची मोहीमही पनवेल लोहमार्ग पोलिसांनी पूर्ण केली आहे. परंतु सर्व प्रक्रिया पूर्ण करूनही बेवारस स्थितीत सापडलेल्या मोबाईलचे मालक उपलब्ध न झाल्याने या सर्व १२ मोबाईलचा जाहीर लिलाव ३० ऑगस्टला पनवेल लोहमार्ग पोलीस ठाण्यामध्ये सकाळी ११.३० ते १२.३० या कालावधीत केला जाणार आहे. पात्र नागरिकांनी कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून मोबाईलच्या जाहीर लिलावामध्ये सहभागी होऊन मोबाईल लिलावा द्वारे विकत घेण्याचे पनवेल लोहमार्ग पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय तायडे यांनी जाहीर केले आहे .पात्र नागरिकांना लिलावामध्ये सहभागी होऊन लिलाव प्रक्रिया पूर्ण कायदेशीर बाबीने पूर्ण झाल्यानंतर मोबाईल लिलावाद्वारे घेण्यात यावेत असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय तायडे यांनी सांगितले आहे. बेवारस स्थितीत सापडलेल्या मोबाईलच्या लिलाव प्रक्रियेमध्ये जास्तीत जास्त पात्र नागरिकांनी सहभागी होण्याचे आवाहनही यावेळी त्यांनी केले आहे.

# दिघी बंदराच्या विकासासाठी लवकरच रेल्वे रुळाच्या कामाला होणार सुरुवात



## प्रकल्पातंर्गत आगरदांडा आणि रोहा रेल्वेने जोडले जाणार

**मुरूड : प्रतिनिधी**

सुमारे २५०० कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक असलेल्या दिघी पोर्टचा विकास झपाट्याने होत असून आता या पोर्टच्या दुसऱ्या टप्प्यात रेल्वे रूळ टाकण्यावर भर देण्यात येत आहे.

दिघी पोर्टचा विकास अदानी ग्रुपकडून करण्यात येत असून पोर्ट विकासाबरोबर आगरदांडा बंदराचासुद्धा विकास करण्यात येणार आहे. सध्या दिघी पोर्ट कार्यान्वित असून लवकरच आगरदांडा बंदराचादेखील विकास करण्यात येणार आहे.

दिघी बंदराच्या विकासासाठी सर्वप्रथम आगरदांडा ते रोहा रेल्वेमार्ग तयार करण्यात येणार आहे. यासाठी भूसंपादन प्रक्रिया तसेच जमीन मालकांना नोटीस पाठवण्याची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून आता लवकरच आगरदांडा ते रोहा रेल्वे लोहमार्गाचे काम सुरू करण्यात येणार असल्याची विश्वसनीय माहिती मिळत आहे. साधारणतः नोव्हेंबर–डिसेंबर महिन्यात रेल्वे रूळ टाकण्याची प्रक्रिया सुरु होणार आहे. हे काम अधिक जलद गतीने पूर्ण झाल्यावर आगरदांडा बंदराच्या विकासाकडे झटपट सुरुवात होणार आहे.

दिघी पोर्टचा ज्याप्रमाणे विकास झाला त्याच धर्तीवर आगरदांडा येथील विकासाची दालने सुरू होणार आहेत. सध्या रेल्वे लाईनच्या कामाचा आराखडा करण्याचे काम सुरु असून लवकरच आगरदांडा ते रोहा रेल्वे जोडली जाणार आहे. हे काम जलद गतीने पूर्ण करण्याचा प्रशासनाचा इरादा असून लवकरच या कामास सुरुवात होणार आहे.

मोठ मोठ्या जहाजांमधून आलेला माल कंटेनरमधून रेल्वेच्या सहाय्याने विविध भागात पोहचविण्यात येणार आहे. त्यामुळे येत्या काही दिवसात रेल्वे लाईनचे काम जलद गतीने सुरु होऊन ते पूर्ण झालेले पहावयास मिळणार आहे.

दिघी व आगरदांडा बंदराच्या विकासामुळे बेरोजगार तरुणांना नोकऱ्या मिळणार असून बेकारी कमी होण्यात मदत होणार आहे तसेच विविध ट्रेंड घेऊन उत्तीर्ण विद्यार्थ्यांना नोकरीची मोठी संधी प्राप्त होणार आहे. केंद्र व राज्य शासनाचा दिघी बंदर प्रकल्प हा महत्वाकांक्षी प्रकल्प असून त्याचा आता विकास पूर्ण स्वरूपात होणार असल्याने बेरोजगार तरुणांना नोकऱ्यासुद्धा मोठ्या प्रमाणात मिळण्यास मदत होणार आहे.

# मुरूड आगारात गॅस पंपासाठी आज बैठक



**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड आगारात गॅस पंप होण्यासाठी खासदार सुनील तटकरे यांच्या उपस्थितीत शनिवार, दिनांक ३० ऑगस्ट रोजी एका विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले असून या बैठकीत एसटी मंडळ तसेच अन्य महत्वाचे अधिकारी तसेच तेल कंपन्याचे अधिकारी उपस्थित राहणार आहेत.

या बैठकीत मुरुड आगरामध्ये गॅस पंप साकरण्यात यावा याबाबत ठोस निर्णय होऊन तातडीने अंमलबजावणी होणार असल्याचे मुरुड तालुका राष्ट्रवादी काँग्रेसकडून सांगण्यात आले आहे. त्यामुळे मुरुड आगारात लवकरच गॅस पंप होण्याचा मार्ग मोकळा होणार असल्याची चिन्हे आहेत.

मुरुड हे पर्यटन स्थळ असून येथे सुप्रसिद्ध जंजिरा किल्ला व मौजमजा करण्यासाठी लाखो पर्यटक येत असतात. मुरुड आगाराच्या सर्व गाड्या आता गॅसवर आधारित झाल्याने या गाड्यांना पेण रामवाडी अथवा अलिबाग आगार येथे गॅस भरण्यासाठी तासन्तास खोळंबून रहावे लागत आहे. सध्या गणपती उत्सवाचा हंगाम असतानासुद्धा मुंबईवरून मुरुड येथे येणाऱ्या गाडयांना येथून गॅस भरताना खूप वेळेची प्रतीक्षा करावी लागत आहे. एसटी महामंडळाने सर्व गाड्या गॅसवर केल्याने डिझेल मध्ये होणारा अतिरिक्त खर्च वाचला, परंतु प्रवासीवर्गाला मात्र नाहक त्रास सहन करावा लागत आहे. एसटी महामंडळाने गाड्या गॅसवर करण्याआधी जेवढी आगार आहेत तिथे गॅस पंप तयार करणे खूप आवश्यक होते, परंतु तसे न करता रायगड जिल्ह्यात नेमक्याच ठिकाणी गॅस पंप असल्याने प्रवासीवर्गाला याचा नाहक त्रास सहन करावा लागत आहे.

एसटी महामंडळाने गाड्या गॅसवर केल्याने त्यांचा मोठा फायदा झाला, पण तिकीट दर जे डिझेल गाडीला होते तेच ठेवण्यात येऊन त्याच्यातसुद्धा वाढ झाली.प्रवासीवर्गाची वेळेची बचत होण्यासाठी आगार तिथे गॅस पंप होणे आवश्यक होते, परंतु तसे न झाल्याने नेमक्याच ठिकाणी गॅस पंप असल्याने प्रवाशांचा वेळ गमावला जात आहे.

याबाबत काही महिन्यांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष व माजी नगराध्यक्ष मंगेश दांडेकर यांनी खासदार सुनील तटकरे यांना निवेदन देऊन मुरुड आगारात गॅस पंपाची निर्मिती व्हावी यासाठी प्रयत्न केले होते.प्रवासीवर्गाच्या वेळेची बचत व्हावी व प्रवास जलद व्हावा यासाठी त्यांनी हे निवेदन खासदार तटकरे याना दिले गेले.

याबाबत प्रस्तुत प्रतिनिधीने मंगेश दांडेकर याना विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, खासदार सुनील तटकरे हा प्रश्न नक्कीच सोडवणार आहेत. आमचा पाठपुरावा सुरु असून लवकरच निश्चित यश मिळणार असल्याचेही त्यांनी सांगितले. याबाबत शनिवारी खासदार तटकरे यांच्या दालनात विशेष बैठक होणार असून प्रवासीवर्गाच्या हितासाठी लवकरच गॅस पंप होणार आहे.

रायगड जिल्हा सोशल मीडिया सेलचे जिल्हा उपाध्यक्ष हसमुख जैन यांनीसुद्धा खासदार सुनील तटकरे हा प्रश्न लवकरच सोडविणार असून मुरुड तालुक्याच्या हितासाठी व प्रवासीवर्गाची समस्या कायमस्वरूपी सोडवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. लवकरच गॅस पंपाचे काम झालेले पहावयास मिळणार असल्याचा आत्मविश्वास व्यक्त केला आहे.

मुरुड आगारात गॅस पंप कार्यान्वित झाल्यास प्रवासीवर्गाला मोठा दिलासा मिळणार आहे. त्या दृष्टीने प्रयत्न सुरू आहेत.

# खोपोलीतील पाणीपुरवठा नियमित करण्याबाबत प्रशासनाशी चर्चा

**खोपोली : प्रतिनिधी**

खोपोली नगर परिषदेच्या गणपती दर्शन घेण्यासाठी गेलेले विविध सामाजिक क्षेत्रातील मान्यवर एकत्र येऊन मुख्याधिकारी पंकज पाटील यांची पाणीपुरवठा नियोजित व्हावे यासाठी भेट घेतली. त्यावरून मुख्याधिकाऱ्यांनी तसेच पाणीपुरवठा विभागाचे भोईर यांनी माहिती दिली.

चर्चेवेळी माजी नगराध्यक्ष दत्तात्रेय मसुरकर, माजी उपनगराध्यक्ष कुलदीप शेंडे, राजू गायकवाड, रमेश जाधव, भाजप शहर अध्यक्ष राहुल जाधव, शिवसेना शहरप्रमुख संदीप पाटील, राष्ट्रवादी शहर अध्यक्ष मनीष यादव, शिवसेना संघटक तात्या रिठे, राजन सुर्वे, युवा उद्योजक विक्रांत साबळे, दिनेश थोरवे, माजी नगरसेविका केविना गायकवाड, वैशाली जाधव, उद्योजक रॉबिन सॅम्युएल, सचिन मसुरकर, गणेश खानविलकर, विकास खुरपुडे आदी उपस्थित होते.

मागील काही वर्षात होणारे वॉटर लिकेज पूर्णपणे बंद करण्यात आले आहे तसेच दोन्ही वेळेचा पाणीपुरवठा तातडीने सुरळीत चालू होईल, असे यावेळी प्रशासनाकडून सांगण्यात आले.



# माथेरानच्या दस्तुरी नाक्यावर पर्यटकांना अभिप्रेत सोयीसुविधा कायमस्वरूपी द्या; स्थानिकांची मागणी

**माथेरान : बातमीदार**

माथेरानला येणाऱ्या पर्यटकांना मुख्य प्रवेशद्वार असणाऱ्या दस्तुरी नाक्यावरून शहरात येण्यासाठी जी काही आवश्यक माहिती ध्वनिक्षेपकाच्या माध्यमातून देण्यात येत होती ती काही दिवसांपासून बंद झाल्याने शहरात जाण्यासाठी वाहतुकीची कशा प्रकारे सुविधा उपलब्ध आहे याबाबत पर्यटकांना माहिती मिळत नाही. त्यामुळे अनेकदा या ठिकाणी पर्यटकांची दिशाभूल होत असल्याने दस्तुरी नाक्यावर माहिती फलक; त्याचप्रमाणे कोणकोणती वाहतुकीची सुविधा आहे याबाबत प्रशासनाने पुढाकार घेऊन पर्यटकांना अद्ययावत माहिती मिळण्याची सोय करावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.



काही वर्षांपासून दस्तुरी नाक्यावर पर्यटकांची दिशाभूल होऊन माथेरानची प्रतिमा दिवसेंदिवस मलिन झाली होती. याचा इथल्या पर्यटनावर विपरीत परिणाम होऊन याची प्रामुख्याने झळ ही स्थानिकांना, व्यापारी, दुकानदार यांना मोठ्या प्रमाणात सोसावी लागत होती. याकामी माथेरानप्रेमी नागरिकांनी पर्यटन बचाव संघर्ष समिती स्थापन करून दस्तुरी या ठिकाणी सुविधा निर्माण व्हाव्यात यासाठी संघर्ष केल्यानंतर दस्तुरी नाक्यावर ध्वनिक्षेपकाद्वारे विविध भाषामधून माहिती देण्यास सुरुवात झाली होती. त्यामुळे पर्यटकांना आपल्या सोयीनुसार तेथील घोडा, हातरीक्षा, मिनिट्रेनची शटल सुविधा आणि ई–रिक्षाच्या माध्यमातून प्रवास करणे सोयीचे बनले होते.

सध्या ध्वनिक्षेपक बंद झाल्याने पर्यटकांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे. या ठिकाणी साधा माहिती फलक लावण्याची हिंमत प्रशासनात नव्हती. त्यावेळी पर्यटन बचाव संघर्ष समितीच्या आंदोलनाच्या रेट्यामुळे महत्त्वाच्या गोष्टी सुरू करण्यात आल्या होत्या. लवकरच सर्व गोष्टी पुन्हा एकदा सुरू करून इथले पर्यटन कशा प्रकारे बहरेल यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलावी, अशी मागणी जोर धरू लागली आहे.

माथेरान येथील पर्यावरण अबाधित राहावे, येथे जगभरातून येणाऱ्या प्रत्येक पर्यटकांची फसवणूक होऊ न देता येथील पर्यटनाबाबत योग्य मार्गदर्शन झाले पाहिजे, त्यांना सन्मानपूर्वक वागणूक मिळाली पाहिजे व इथल्या पर्यटन व्यवसायात भर पडावी या उद्देशातून माथेरान पर्यटन बचाव संघर्ष समितीची स्थापना झाली. यामध्ये सर्वपक्षीय प्रतिनिधींचा समावेश आहे आणि या संदर्भात आमदार महेंद्र थोरवे यांच्या मार्गदर्शनाखाली माथेरान नगर परिषदेच्या सभागृहात सर्व विभागाच्या अधिकारीवर्गासोबत बैठक झाली होती आणि त्यामध्ये माथेरानच्या विविध समस्यावर पर्यटकांना अधिक चांगल्या सुविधावर चर्चा करून निर्णय घेण्यात आले होते, मात्र स्थानिक प्रशासनाकडून अद्याप कोणत्याही निर्णयाची अंमलबजावणी झालेली दिसत नाही.

**माथेरान पर्यटन बचाव संघर्ष समितीने स्थानिक प्रशासनाकडे याबाबत वारंवार विचारणा करण्यात आली मात्र थातूरमातुर उत्तरे दिली जातात. हे अत्यंत खेदजनक असून येणाऱ्या काळात स्थानिक प्रशासनाने योग्य ती पावले उचलून व ठोस उपाययोजना करून माथेरानकरांना अपेक्षित असणाऱ्या समस्या लवकरात लवकर दूर कराव्यात.**

**–चंद्रकांत जाधव,**
**माजी उपनगराध्यक्ष तथा भाजप पदाधिकारी**

# विजेच्या धक्क्याने म्हशीचा मृत्यू

**कर्जत : प्रतिनधी**

कर्जत तालुक्यातील बोरीवली येथील जंगलात चारा खाण्यासाठी गेलेल्या म्हशींपैकी दोघींना विजेच्या तारांचा धक्का लागला. त्यातील एक म्हशीचा मृत्यू झाला.

बौखवली येथे विजेची वाहिनी खाली लोंबकळत होती. सकाळच्या वेळी चारा खाण्यासाठी जंगल भागात जात असलेल्या म्हशींना विजेच्या वाहिनीचा धक्का बसला. त्या धक्क्यात त्यातील अनेक म्हशींपैकी दोन म्हशी तडफडू लागल्या. त्यापैकी एका म्हशीचा जागीच मृत्यू झाला. या घटनेत मृत झालेली म्हैस दुभती असल्याने तिच्या मृत्यूमुळे शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. महावितरण कंपनीकडून या मृत म्हशीच्या मृत्यूबद्दल नुकसान भरपाई मिळावी यासाठी प्रस्ताव करून वरिष्ठ कार्यालयाला पाठवण्यात आला आहे.



# श्रीवर्धनमध्ये दीड दिवसाच्या बाप्पांचे विधीवत विसर्जन

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन शहरात दीड दिवसांच्या गणरायाच्या विसर्जन सोहळ्याने मंगळवारी वातावरण मंगलमय झाले. लाडक्या बाप्पाचे स्वागत जितक्या भक्तिभावाने झाले होते, तितक्याच उत्साहात आणि जल्लोषात त्यांना निरोप देण्यात आला.

गणेशभक्तांनी पारंपारिक वेशभूषा धारण करून, टाळ–मृदुंग–चिपळ्या व ढोल–ताशांच्या गजरात बाप्पाला समुद्रकिनाऱ्याकडे घेऊन जात विसर्जन केले. मार्गावर गणपती बाप्पा मोरया, पुढच्या वर्षी लवकर याच्या घोषणा दुमदुमत होत्या. काही ठिकाणी गणेशभक्तांनी पारंपारिक गाणी व भजनांच्या तालावर तर काही ठिकाणी बँडच्या सुरावटींवर बाप्पाला निरोप दिला.स्थानिक प्रशासन, पोलीस व स्वयंसेवी संस्थांनी या सोहळ्यासाठी विशेष व्यवस्था केली होती. वाहतूक कोंडी होऊ नये म्हणून नियोजन करण्यात आले होते



# माणगावात दीड दिवसाच्या २५०६ गणरायांना भक्तिपूर्ण वातावरण निरोप



**माणगाव : प्रतिनिधी**

गणपती बाप्पा मोरया... पुढच्या वर्षी लवकर या... गजरात माणगाव तालुक्यातील २५०६ गणपतींना काळ व गोद नदीच्या पात्रात तसेच तलावातून भक्तिमय वातावरणात निरोप देण्यात आला. या वेळी माणगाव पोलीस ठाण्यातर्फे चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

विसर्जन दिवशी दुपारपासूनच पावसाची संततधार तालुक्यात सुरू होती. दुपारी ३ वाजल्यापासून सायंकाळपर्यंत विसर्जन तालुक्यात सुरू होते. विसर्जनासाठी आलेल्या सर्व गणेशभक्तांचे नगरपंचायतीतर्फे स्वागत करण्यात आले. बामणोली गोद नदीठिकणी विसर्जनासाठी आणलेल्या सर्व गणरायांचे नगरसेवक अजित तार्लेकर यांनी नगरपंचायतीतर्फे स्वागत केले तसेच माणगाव येथील काळ नदी ठिकाणच्या गणपती विसर्जन घाटाजवळ नगरपंचायतीचे कर्मचारी गणरायाचे विसर्जन करण्यासाठी तैनात ठेवण्यात आले होते. या वेळी काळनदी विसर्जन घाटाजवळ तसेच पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. नगरपंचायतीतर्फे आलेल्या सर्व गणरायांचे स्वागत करण्यात आले. अत्यंत उत्साही वातावरणात व शांततेत माणगाव तालुक्यात दीड दिवसांच्या गणपतीचे विसर्जन करण्यात आले.

# माथेरानमध्ये हिंदू-मुस्लिम एकोप्याचे दर्शन

## गणेश विसर्जन मिरवणुकीत बंधूभाव

**माथेरान : बातमीदार**

माथेरान शहरात दीड दिवसाच्या बाप्पांना गुरुवारी सायंकाळी वाजतगाजत निरोप देण्यात आला. गणेश विसर्जनासाठीभक्तांनी मिरवणुकीत आणि विसर्जनस्थळी मोठी गर्दी केली होती. या वेळी मुस्लिम बांधवांनी सर्व गणेशभक्तांना गुलाबपुष्प देऊन हिंदू–मुस्लिम एकोप्याचे दर्शन घडवल्याचे दिसून आले.



माथेरान शहरात गुरुवारी सायंकाळी गणपती बाप्पा मोरया पुढल्या वर्षी लवकर या, गणपती गेले गावाला चैन पडेना आम्हाला या जयघोषात भक्तिभावाने निरोप देण्यात आला. उत्साहात आणि आनंदात गणेश भक्तमहिला व गोपाळांसह मिरवणुकीत नाचत गात सहभागी झाले होते.

येथील मुख्य बाजारपेठेत जामा मशिदीसमोर गतवर्षीप्रमाणे या वर्षी स्थानिक मुस्लिम बांधवांकडून गणेशभक्तांना गुलाबपुष्प देऊन गणेशोत्सवाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. पावसाची संततधार सुरू असल्याने गणेशभक्त भक्तिरसात भिजून चिंब झाले होते.त्याचबरोबर विसर्जनस्थळी माथेरान गिरीस्थान नगर परिषदेकडून विद्युत रोषणाई करून संपूर्ण परिसर सुशोभित करण्यात आला होता.

निर्माल्य जमा करण्यासाठी नगर परिषदेकडून स्वच्छतादूतांची नेमणूक करण्यात आली होती तसेच गणेश विसर्जन मिरवणुकीत या ठिकाणी कोणताही अनुसूचित प्रकार घडू नये यासाठी पोलीस बंदोबस्तदेखील चोख ठेवण्यात आला होता. यामुळे माथेरान शहरातील दीड दिवसाच्या बाप्पाला उत्साही वातावरणात आणि आनंदात निरोप देण्यात आला.

